आहे.''

''गोस्वामी, आमचं असं म्हणणं नाही. शरयू नदी पार करण्याचा एखादा मार्ग सुचवा ! आपण आमच्यावर दया केली नाही, तर चोरीच्या मालासहित आम्ही पकडले जाऊ.''

तुलसीदास काही क्षण शांत राहिले... ■ ''मी तुम्हाला एक चिठ्ठी लिहून देतो. ती चिठ्ठी तुमच्यापैकी एकाने हातात धरावी. एकमेकांचा हात पकडून पाण्यातून पुढे चालत राहा ! अशाप्रकारे तुम्ही शरयू नदी पार करून किनारी जाल !''

तुलसीदास यांनी चिठ्ठी लिहून दिली. चोर चिठ्ठी हातात घेऊन शरयू नदी पार करून गेले. त्यावेळी नदीचा प्रवाह मंद झाला होता. किनारी जाताच, चिठ्ठीत काय लिहिलं आहे, ते त्यांनी पाहिलं. चिठ्ठीत 'राम' लिहिलं होतं.

चोरांना वाटलं, नदी पार करणं सोपं आहे. आपण एका कागदावर 'राम' लिहून पुन्हा तुलसीदास यांच्या किनाऱ्याकडे जाऊ. रामनामाची चिठ्ठी घेऊन ते नदीत उतरले. नदी पार करून किनारी पोहोचले. तुलसीदास यांच्या चरणांवर मस्तक ठेवलं. ■ ''प्रभु, आपण लिहून दिलेल्या 'राम' या चिठ्ठीमुळे आम्ही शरयू नदी पार केली. दुसऱ्या कागदावर आम्ही 'राम' लिहिलं; आणि नदी पार करून आपल्याकडे आलो.''

''हे बघा, वाईट कृत्य आपल्या मार्गात आड येतं. तुम्ही चोरी केली, हे पाप आहे. धर्मापुढे पापाचं आचरण चालत नाही. पहिल्यांदा चोरी करणं सोडा ! दुसरं, तुम्ही 'राममय' व्हा !''

चोरांनी तुलसीदास यांच्या चरणांवर मस्तक ठेवले. त्यांनी चोरी न करण्याची शपथ घेतली... असा रामनामाचा प्रभाव आहे.

## धनुर्धारी 'राम'

एकदा रामाने हनुमानास विचारले, ■ ''हनुमान ! तुला काय देऊ ?'' ■ ''प्रभु ! आपण माझ्या हृदयात रामरुपात विराजमान व्हा !''

भगवान राम हनुमंताच्या हृदयात विराजमान होण्यासाठी आले. तेव्हा हनुमंताने त्यांना मनाई केली.

''प्रभु, माघारी परता हं !''

''का, परत का जाऊ ?''

''महाराज ! धनुष्य-बाण न घेता माझ्या हृदयात विराजमान होऊ नका.''

''धनुष्य-बाण घेऊन कोणाच्याही हृदयात स्थानापन्न होणं म्हणजे निर्दयीपणा आहे. हृदय कोमल अवयव आहे; आणि अशा स्थानी मी धनुष्य-बाण घेऊन बसू ?''

''असं नाही, महाराज ! आपण धनुष्यधारी होऊन बसा ! महाराज, मी एक जीवित प्राणी आहे. म्हणून हृदय केव्हा निर्दयी होईल ते सांगता येत नाही. धनुष्य-बाण घेऊन बसलात तर आपण केव्हाही माझ्या निर्दयीपणाचा नाश करू शकाल. म्हणून सांगतो, मला 'धनुर्धारी राम'च योग्य वाटतात.''

## रामराज्य

अयोध्येच्या दरबारात हनुमान आला. इकडे-तिकडे नजर फिरविली. लक्ष्मण दिसला, शत्रुघ्न दिसला; परंतु भरत कोठेच दिसला नाही. भरत दिसत नाहीत ? कुठे गेले ? म्हणून हनुमान भरताला शोधत शोधत संपूर्ण दरबारात फिरला. रामाच्या राजसिंहासनाच्या मागे जाऊन पाहातो, तर तिथे हातात छत्र घेऊन उभा असलेला भरत दिसला. रामाच्या डोक्यावर त्याने छत्र धरलं होतं. हे दृश्य पाहताच हनुमंताच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या.

''प्रभु, आपण इथे का ? राम वनवासात असताना आपण नसता, तर रामाचं राज्य चाललं नसतं. आपण मागे उभे का ?''

''हनुमान, रामाच्या समोर जाण्यासारखं उभ्या आयुष्यात मी तसं कोणतंही कार्य केलेलं नाही. म्हणून मी आहे तिथेच ठीक आहे.''

''आपण पुढे यावं !''

''नाही. मी इथेच ठीक आहें.''

''नाही. आपण पुढे या !''

''मला हे छत्र धरण्याची सेवा मिळाली, हें मी माझं परम भाग्य समजतो. त्यासाठीच मी पात्र आहे. केवळ साधु-संतांनाच समोर स्थान असतं.''

हनुमानाला वाईट वाटलं. समोर येऊन रामाला म्हणाला, ''महाराज, भरत मागे उभे आहेत. आपण त्यांना समोर बोलवा !''

राम म्हणाला, ■ ''भरत आहे त्याच जागी ठीक आहे.''

''महाराज, आपण किती निष्ठुर आहात !''

''नाही, हनुमान ! मला सांग, भरत काय करीत आहे ?''

''त्याने आपल्यावर छत्र धरलं आहे.'' ■ ''हो ना ! मला तुला हेच सांगायचं आहे... भरताचं छत्र नसतं तर या देशात रामराज्य झालं नसतं. हे तर एका संताने माझ्यावर छत्र धरलं आहे. म्हणून राज्यकर्त्यांनी राज्य करावं; परंतु त्यांच्या राज्यकारभारावर छत्रछाया असली पाहिजे ती संतमहंतांच्या कृपेची, त्यांच्या महान शिकवणुकीची. तेव्हाच रामराज्य टिकू शकेल.''

०००

# साईउवाच

## साईचे बोल होती ना फोल

– संग्राहक : प्र. का. सोमण
(निवृत्त लेफ्टनंट कर्नल)



❖❖❖

**महान साईभक्त कै. अण्णासाहेब दाभोलकर यांनी लिहिलेल्या 'श्री साईसच्चरित' पोथीतील श्री साईबाबांच्या उद्‌गारांचा अमृतकलश संग्रहित करून लेफ्टनंट कर्नल श्री. सोमण (निवृत्त) यांनी साईभक्तांना सादर केलेला आहे. रामनवमीच्या या अंकापासून आपण 'साईउवाच' या नव्या लेखमालेचा श्रीगणेशा करीत आहोत.**

❖❖❖

कै. अण्णासाहेब (गोविंद रघुनाथ) दाभोलकर या महान साईभक्त व संतश्रेष्ठींनी 'श्री साईसत्‌चरित्' हा साईनाथांवर, त्यांचेच हयातीत, त्यांचेच कृपाशीर्वादाने महान ग्रंथ लिहून समस्त साईभक्तांवर अनंत उपकार करून ठेवले आहेत व पुढे येणाऱ्या साईभक्तांच्या पिढ्यानपिढ्या हा दिव्य ग्रंथ वाचून व त्याची पारायणे करून महान भक्त कै. श्री. दाभोलकरांना अखंड धन्यवाद देत राहतील, यात संदेह नाही.

या 'साई सत्‌चरित्' ग्रंथात कै. श्री. दाभोलकरांनी बहुतेक सर्व अध्यायांत श्री साईनाथांचे स्वतःचे प्रत्यक्ष बोल 'अवतरण चिन्हांत' दिलेले आहेत. ते सारे बोल एकत्र करून प्रत्येक अध्यायातील त्या त्या ओव्यांचा संदर्भ या बोलांसाठी खालील लिखाणात दिला आहे. हेतु हा की, श्री साईनाथांचे प्रत्यक्ष बोल सुटसुटीतपणे, एकसंघ, साईभक्तांना वाचता यावे व त्यायोगे भक्तिसुखाचा सुखद अनुभव चाखता यावा.

हा उद्देश सिद्धीस जायचा असेल तर साईनाथांचे हे सारे बोल कोणत्या संदर्भात काढले गेले हेही भक्तांना अगदी थोडक्यात पार्श्वभूमी देऊन सांगणे जरुरीचे वाटले. नाहीतर नुसते बोल, कोणासाठी, कोणत्या परिस्थितीत उच्चारले गेले ते न कळल्याने, प्रत्यक्ष बोलांचे संपूर्ण आकलन होणे कठीण जाईलसे वाटले व याकरताच केवळ प्रत्येक बोलासाठी थोडीशी पार्श्वभूमी व त्रोटक संदर्भ दिला आहे.

### अध्याय १ ला

**पार्श्वभूमी**

एकदा शिरडी गावात महामारीची साथ आली व ती अत्यंत रौद्र स्वरूप धारण करणार हे उघड झाले. प्रत्यक्ष भगवान श्री साईनाथ शिरडीत देहधारी असताना महामारीचे भय ते कोणाला? तरीपण, ती साद नाहिशी करण्यासाठी श्री साईनाथांनी अगदी अनाकलनीय असा मार्ग शोधून काढला. त्यांनी मोठे 'जाते' पोत्यावर घातले व स्वतः पाय पसरून, जात्याचा खुंटा भक्कम करून, गहू दळायला लागले. साईबाबा स्वतः जात्यावर बसले आहेत ही बातमी वाऱ्यासारखी गावात

पसरली व सर्व साईभक्तांचा, खासतर महिला साईभक्तांचा लोंढा बाबांच्या मशिदीकडे (द्वारकामाईकडे) धावत सुटला. त्यातील चार महिला मशिदीच्या पायऱ्या चढून वर गेल्या व साईनाथांशी प्रत्यक्ष झटापट करून जात्यावर गहू दळण्याचे काम स्वत:कडे घेऊन गहू दळू लागल्या. बाबांनी प्रथम लटका राग दाखविला. पण नंतर स्मित हास्य करून ते बायांचे कौतुक पाहत राहिले. येथवर सारे ठीक झाले. पण त्या बायांना वाटले की बाबा तर कधी पोळ्या - रोट्या स्वत: करीत नाहीत, ते तर भिक्षा मागून राहतात, मग हे एवढे पोतेभर गहू कशासाठी दळले? त्यांना वाटले, बाबा ते त्यांनाच देणार आहेत. असे समजून त्यांनी पिठाच्या आपापसात वाटण्या सुरू केल्या. हे पाहताच त्यावेळी बाबा त्यांच्यावर एकदम चवताळले व ओरडले-

**''चळल्या काय, कुठे नेता। बापाचा माल घेऊन जाता॥**
**जा शिवेवरी नेऊन आता। पीठ तत्वता टाका ते ॥१२९॥**

**आल्या रांडा फुकट खाऊ। लुटाया मज धावू धावू।**
**गहू माझे काय कर्जाऊ। पीठ नेऊ पाहता'' ॥१३०॥**

**याबाबत कै. दाभोलकर पुढे लिहितात:**
**''संत देखिले अनेक। परी दळणारा हाचि एक॥**
**गहू पिसण्याचे काय ते सुख। त्याचे कौतुक तो जाणे ॥११६॥**

**गोधूम नाही ती महामारी। भरडावया जात्यात वैरी।**
**तो मग भरडा शिवेवरी। उपरा उपरी टाकवी ॥१३४॥**

**गावात होती मरीची साथ। करिती हा तोडगा साईनाथ।**
**झाली रोगाची वाताहात। गावास शांतत्व लाधले ॥१३६॥**

**काय असावा हा अनुबंध। गव्हा-रोगाचा काय संबंध।**
**पाहुनि अतर्क्य कारण निर्बंध। वाटले प्रबंध लिहावा ॥१३८॥''**

**शुभंकर अध्याय पहिला समाप्त।**

# अध्याय २ ला

**पार्श्वभूमी**

**श्री** साईनाथांच्या अगाध लीलांचे वर्णन समस्त साईभक्तांमध्ये अखंडपणे चर्चिले जात होते व त्या भक्तिप्रेमात सारेजण न्हाऊन निघत होते. अनेक भक्तांकडून नानाविध कथा व प्रत्यक्ष श्री साईनाथांचे मुखातून त्यांच्या आत्मतृप्तीचे व स्वानुभवाधिष्ठित उद्गार ऐकून ते चरित्र रूपाने श्रोत्यांना सादर करावे या अत्यंत मौलिक व दैवी विचाराने कै. दाभोलकरांच्या (यापुढे, प्रेमाखातर या संबंध लिखाणात आपण त्यांना अण्णासाहेब म्हणून संबोधूया) मनाची पक्की पकड घेतली. लगेच त्यांनी हा विचार बाबांच्या अत्यंत लाडक्या शामाकडून (म्हणजेच माधवराव देशपांडे या महान साईभक्ताकडून) एक चांगली वेळ साधून बाबांच्या कानावर घातला. बाबांच्या रुपाने साक्षात परमात्मा या भूतलावर अवतारला होता; त्या देवाच्या प्रसिद्धी, नावलौकिक आदि गोष्टी जवळ तरी फिरकू शकत होत्या का? म्हणून हा साईचरित्र लेखनाचा विषय शामाने बाबांचे कानावर घातल्यावर बाबा म्हणाले-

**''मी तो केवळ भिकारी। फिरतो भिक्षेसी दारोदारी॥**
**ओली कोरडी भाजी भाकरी। खाऊनि गुजारी काळ मी ॥६८॥**
**त्या माझी कथा कशाला? कारण होईल उपहासाला॥**

**पार्श्वभूमी**

**अ**से जरी साईनाथ सुरुवातीस म्हणाले तरी त्यांनी अण्णासाहेबांचे मनोगत जाणले व त्यांना तू 'लाहसील मनोरथा' असे म्हणून ग्रंथ लेखनास शुभाशीर्वाद दिला, यावेळी अण्णासाहेबांनी बाबांचे कमलचरणांवर डोई ठेवून बाबांचे मनस्वी आभार मानले. याच आशिर्वच संदेशात बाबा पुढे अण्णासाहेबांना म्हणाले-

**''कथा वार्तादि अनुभवांचा। संग्रह साचा करावा॥**
**दफ्तर ठेवा बरे आहे। त्याला माझे पूर्ण सहाये॥**
**तोतर केवळ निमित्त पाहे। लिहावे माझे मीच की ॥७६॥**

**माझी कथा मीच करावी। भक्तेच्छा मी पुरवावी।**
**तयाने अहंवृत्ती जिरवावी। निरवावी ती मत् पदी ॥७७॥**

**ऐसे वर्ते जो व्यवहारी। तया मी पूर्ण सहाय्य करी॥**
**हे कथाच काय सर्वतो परी। तया घरी राबे मी ॥७८॥**

**अहंवृत्ती जेव्हा मुरे। तेव्हा तयाचा ठावही नुरे॥**
**मीच मग मीपणे संचारे। माझ्याचि करे लिहीन मी ॥७९॥**

**ये बुद्धि जे कर्म आरंभिले। श्रवण मनन का लेखन वाहिले।**
**ज्याचे त्यानेच ते संपादिले। त्यास तो केले निमित्त ॥८०॥**

**अवश्यमेव दप्तर ठेवा। घरी दारी असा कुठे वा।**
**वारंवार आठव ठेवा। होईल विसावा जिवासी ॥८१॥**

**करिता माझिया कथांचे श्रवण। तयांचे कीर्तन आणि चिंतन।**
**होईल मद्भक्तीचे जनन। अविद्या निरसन रोकडे ॥८२॥**

**जेथे भक्ती श्रद्धांवित। तयाचा मी नित्यांकित।**
**ये अर्थी न व्हावे शंकित। इतरत्र अप्राप्य मी सदा ॥८३॥**

**सद्भावे या कथा परिसता। निष्ठा उपजेल श्रोतिया चित्ता।**
**सहज स्वानुभव स्वानंदता। सुखावस्था लाधेल ॥८४॥**

**भक्तासि निजरुप ज्ञान। जीव शिवा समाधान।**
**लक्षले अलक्ष निर्गुण। चैतन्यघन प्रगटेल ॥८५॥**

**ऐसे या मजकथांचे निंदान। याहुनी काय पाहिजे आज।**
**हेचि श्रुतीचे ध्येय संपूर्ण। भक्त संपन्न ये अर्थी ॥८६॥**

**जेथे वादावादीची बुद्धी। तेथे अविद्या माया समृद्धि।**
**नाही तेथ स्वहित शुद्धी। सदा दुर्बुद्धी कुतर्की ॥८७॥**

**तो न आत्मज्ञानासि पात्र। तयासी ग्रासी अज्ञान मात्र।**
**नाही तयासी इह परत्र। असुख सर्वत्र सर्वदा ॥८८॥**

**नको स्वपक्ष स्थापन। नको परपक्ष निराकरण।**
**नको पक्षद्वष्कात्मक विवरण। काय ते निवारण सायास ॥८९॥''**

पार्श्वभूमी

एके दिवशी, शिरडीत श्री. अण्णासाहेबांचा श्री. बाळासाहेब भाटे या साईभक्ताशी 'दैव थोर की कर्तृत्व थोर' या विषयावर वाद सुरू झाला व दोघेही आपापल्या विचाराला ठामपणे धरून राहिले. केवळ दैवावर भार ठेवून कसे चालेल हे श्री. अण्णासाहेबांचे म्हणणे होते तर 'होष्यमाण टळणार नाही' हे विरुद्ध बाजूचे मत होते. वादविवादाने कोणाचेच समाधान झाले नाही. फुकट मनस्ताप मात्र पदरी आला. मग दुपारी इतर सर्वांसह हे दोघे मशिदीत बाबांचे दर्शनास गेले. त्यावेळी बाबा म्हणाले-

**''काय चालले होते वाड्यात। वाद कशाचा होता भांडत।**
**काय म्हणाले हे हेमाडपंत। मजकडे पाहत**
**बोलले ॥१६६॥''**

अण्णासाहेबांना प्रश्न पडला की एवढ्या लांबून वाड्यातून मशिदीत बाबांना वादविवाद कसा ऐकू आला?

श्री. अण्णासाहेब पुढे म्हणतात-

**''वाड्यापासुनि मशिदीपर्यंत। मध्यंतरी अंतर बहुत।**
**बाबासी कळले कसे हे वृत्त। आश्चर्य चकित मी**
**मनी ॥१६७॥**

**असो, ऐसा मी वाग्बाण हत। जाहलो निःशब्द लज्जावंत।**
**पहिल्याच भेटीत की हे अनुचित। जडते अविहित**
**मजकरवी ॥१६८॥**

**हे 'हेमाडपंत' नामकरण। प्रातःकालींचा वाद या कारण।**
**तेणेचि बाबासी हेमाडस्मरण। मनी खूण मी बांधली ॥१६९॥**

(श्री. अण्णासाहेब दाभोलकरांना 'हेमाडपंत' पदवी बाबांनी कशी दिली याचा थोडक्यात इतिहासही या तीन ओव्यांत अण्णासाहेबांचे तोंडूनच आपणास ऐकायला मिळाला.

**शुभंकर अध्याय दुसरा समाप्त।**

ooo

# साईवंदना

## ॥ॐ श्री साईराम॥

नाम मुखी घेतां मन होई शांत,
संसाराचा ताप दूर होत।
सांगू किती रे, दुःख ह्या जीवाचे,
घडी, घडी होई, मन रे अशांत।
अंतरीची हांक ऐकतोस कां रे ?
समझू कशी मी तूं आहे प्राता।
भवसागर हा कसा पार करू
हात देई देवा हेची मागते मी।
तूंच माझी माता तूंच माझा पिता।
कोणी नाही देवा ह्याची जगता ॥नाम॥

**■ सौ. सुनेत्रा ना. मालपेकर**
भाईंदर(प.)

## ॥श्री साई समर्थ॥


साई सारखे दैवत माझे।
हृदयी माझ्या नित्य विचारे।
अवतार असे हा श्री दत्तात्रयाचा।
श्री साई असे तिन्ही लोकांचा।
करुणा सागर मानवतेचा ॥१॥

नित्य चिंतन ते करावे साईचे।
शिरडी गावी वास करिसी।
भिऊ नकोस मी पाठीशी आहे।
आधार देई आम्हा भक्तांना।
आनंदाने तुझे चरण मी धरतो ॥२॥

पाहुनी डोळे अघडूनी भव्य सूंदर तुझी मूर्ती।
आनंदाने अश्रु नयनी झरती।
सात्वीकतेचे नाव उमळती।
चरणी नमितो मस्तक साई माझे ॥३॥

**■ श्री. दिलीप सावंत**
खोपोली

ooo



# श्री साईबाबा समाधी मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्प

# स्वप्नाकडून सत्याकडे....
# संकल्पाकडून सिद्धीकडे....

लेखन-संकलन : विद्याधर ताठे

## पुनर्विकास प्रकल्पाची साद्यंत कहाणी

○○○

श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन करण्यासाठी शिरडीस भक्तीभावाने धावून येणाऱ्या भक्तांची प्रचंड वाढती संख्या लक्षात घेता, भक्तांची अधिक चांगल्याप्रकारे रांग व दर्शनव्यवस्था होणे अगत्याचेच नव्हे तर अत्यावश्यक झालेले आहे. यादृष्टीने मंदिर परिसराचा पुनर्विकास केला जावा अशी अनेक भक्तांची मागणी होती व संस्थानच्या विश्वस्त मंडळाचीही तीव्र इच्छा होती. ही अनेक वर्षांची भक्तांची मागणी व विश्वस्त मंडळाची इच्छा आता सत्याल येत आहे. भक्तांच्या स्वप्नपूर्तीची व विश्वस्त मंडळाच्या संकल्पपूर्तीची ही साद्यंत कहाणी, साईभक्तांसाठी मुद्दाम आम्ही 'श्री साईलीला'मधून प्रकाशित करीत आहोत.

श्री साईबाबा समाधी मंदिर परिसराचा पुनर्विकास कशाप्रकारे केला जावा याबद्दल विविध तज्ज्ञांची मते, भक्तांच्या इच्छा लक्षात घेऊन विश्वस्त मंडळाने सांगोपांग चर्चा करून एक योजना तयार केली आणि अत्यंत पारदर्शक कार्यपद्धतीने ही योजना आता कार्यान्वित होत आहे. त्या योजनेविषयी विविध टप्प्यांबद्दलचा साद्यंत लेख या अंकात सादर केलेला आहे. याबद्दल वाचकभक्तांनी आपल्याही प्रतिक्रिया 'श्री साईलीला'स कळवाव्यात. त्यांचे सहर्ष स्वागत आहे.

– कार्यकारी संपादक

○○○

## प्रकल्पाची वैशिष्ट्ये

# पुनर्विकासाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत

- ❖ श्री साईबाबांच्या पावन स्पर्शाने पुनित झालेल्या चावडी, द्वारकामाई, समाधी मंदिर, दीक्षितवाडा, या वास्तुंचे सुदृढीकरण करून जसेच्या तसे रक्षण – जतन करणे.
- ❖ बाबांना प्राणप्रिय वाटणाऱ्या लेंडी बागेचे पुराण वस्तू म्हणून सुशोभिकरण व रक्षण करणे.
- ❖ आज बाबांचे समाधी मंदिर इतर इमारतींच्या गर्दीमध्ये दुरून दिसतच नाही हे लक्षात घेऊन शिर्डीत पाऊल ठेवताच दूर मुख्य रस्त्यावरूनच बाबांच्या समाधी मंदिराचा कळस दिसेल अशी योजना.
- ❖ समाधी मंदिराच्या परिसराच्या चारी दिशेना चार सुशोभित प्रवेशद्वारांची निर्मिती आणि त्या प्रत्येक द्वारातच चप्पल स्टॅण्डची व पाय धुण्याची 'पादप्रक्षालन' व्यवस्था.
- ❖ शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीच्या तळ मजल्यावर व पहिल्या मजल्यावर दर्शनार्थीसाठी सर्व सोयी-सुविधांनी युक्त अशी अद्ययावत दर्शनबारीची सोय.
- ❖ समाधी मंदिर लगतच्या रस्त्यावरून शिर्डीकर ग्रामस्थांना जाता येता होणारा गर्दीचा त्रास लक्षात घेऊन साईभक्त आणि ग्रामस्थ अशा उभयतांच्या सोईसाठी दर्शनबारी रस्त्याखालून भुयारी मार्ग काढून मंदिरात नेण्याची योजना.
- ❖ सत्यनारायण पूजेसाठी आणि अभिषेक पूजेसाठी स्वतंत्र प्रशस्त दालनांची सोय.
- ❖ बाबांच्या काळातील बाबांनी वापरलेल्या वस्तूंचे स्वतंत्र वस्तुसंग्रहालय. वाचनालय, बुकस्टॉल, देणगी कक्ष आदी सोयी.
- ❖ नामस्मरण, साईजप, व साईध्यान करण्यासाठी खास ध्यानमंदिराची व्यवस्था.
- ❖ दर्शनबारीच्या भिंतीवर श्रीसाईसच्चरित पोथीतील काही प्रमुख प्रसंगांचे देखावे चितारून, प्रसंगचित्रे व ओव्याद्वारे बाबाचे जीवनदर्शन व संदेशदर्शन घडविण्याची योजना तसेच काही ठिकाणी म्युरल द्वारे भिंतीची सजावट करण्याची योजना.
- ❖ भक्तांना ठिकठिकाणांहून समाधी मंदिरातील बाबांच्या मूर्तीचे व समाधीचे सतत दर्शन घडविण्यासाठी 'क्लोज सर्किट टीव्ही' ची विविध ठिकाणी व्यवस्था. विशेषतः दर्शनबारीमध्ये आरती व इतर भजनांच्या श्रवणाची खास साऊंड सिस्टीमद्वारे व्यवस्था.
- ❖ समाधी मंदिर परिसरात भक्तांच्या विरंगुळ्यासाठी-विश्रांतीसाठी उद्यानदृश्य सुशोभिकरण केलेल्या भव्य कोर्टयार्डची योजना.
- ❖ यात्रेच्या काळात प्रचंड संख्येने येणाऱ्या भाविकांच्या तात्पुरत्या गरजा लक्षात घेऊन, लॉक रुम, सुलभ शौचालये, स्नानगृहे आदींची मोठ्या संख्येने व्यवस्था.
- ❖ सर्वांना सुलभ व सोयीची ठरावी अशी वहानतळाची सोय.

मानवधर्म व विश्वबन्धुत्वाची शिकवण देणाऱ्या श्री साईबाबांचे शिरडी येथील समाधी मंदिर आज देशविदेशातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान झालेले असून सध्या रोज सरासरी ३० ते ४० हजार भाविक शिरडीस भेट देत आहेत. विशेषत: गुरुवार, रविवार आणि सुट्टीच्या दिवशी ही संख्या बरीच वाढते. उत्सवकाळात तर ती तीन-साडेतीन लाखांपर्यंत जाते. श्री साईबाबांच्या दर्शनास एवढ्या प्रचंड संख्येने येणाऱ्या व श्रद्धा-सबुरीने रांगेत तिष्ठत राहणाऱ्या या भाविकभक्तांची निदान दर्शनाची व्यवस्था योग्यप्रकारे, प्रसन्न वातावरणात व अत्यंत सुलभ रीतीने व अल्पकाळात करणे आणि तेही मंदिर परिसरातच करणे हे आपले आद्य कर्तव्य समजून संस्थानच्या विद्यमान व्यवस्थापन मंडळाने समाधी मंदिर परिसराचा सर्वांगिण, आधुनिक सोईसुविधांनी सुसज्ज असा योजनाबद्ध पुनर्विकास करण्याचे कार्य हाती घेतले आहे. हे बहुतेक सर्व साईभक्तांना माहीत आहेच.

## कार्याचा पहिला टप्पा

या व्यापक पुनर्विकास प्रकल्पाचा पहिला भाग म्हणून शिरडी संस्थानतर्फे अखिल भारतीय पातळीवर वास्तुशास्त्रज्ञांची (आर्किटेक्टस्‌ची) एक राष्ट्रीय स्पर्धा घेण्यात आली.


(१) श्री साईबाबांच्या वास्तव्याने पूनित झालेल्या सर्व वास्तूंचे जसेच्या तसे रक्षण-जतन करणे.

(२) शिरडीस येणाऱ्या लाखो साईभक्तांच्या दर्शनाची सर्व सोईसुविधांनी सज्ज अशी सुलभ व्यवस्था करणे.



भूमिपूजनापूर्वी श्री. साईबाबांच्या पादुकांची पूजा करताना संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर, त्यांच्या पत्नी आणि विश्वस्त.

ही दोन प्रमुख उद्दिष्टे डोळ्यापुढे ठेवून वास्तुशास्त्रज्ञांना त्यांची मॉडेल्स व कल्पनाचित्रे तयार करण्यास सांगण्यात आले होते. या स्पर्धेची वृत्तपत्रातून भारतभर जाहिरात करण्यात येऊन देशभरातील अनेक वास्तुशास्त्रज्ञांना या स्पर्धेत भाग घेण्याचे खुले आवाहन करण्यात आले होते. या स्पर्धेत देशभरातून उत्तम प्रतिसाद लाभला. देशाच्या विविध प्रांतातील - विविध महानगरातील अनेक नामवंत - प्रख्यात वास्तुविशारद संस्थांनी या स्पर्धेत भाग घेऊन आपली मॉडेल्स् व कल्पनाचित्रे पाठविली. या खुल्या स्पर्धेसाठी एकूण ४९ प्रवेशिका दाखल झाल्या होत्या. त्यापैकी सर्वाधिक २३ प्रवेशिका महाराष्ट्रातून तर उत्तर प्रदेशातून १५, मध्य प्रदेशातून ४, प. बंगालमधून १, तामिळनाडूतून १, कर्नाटकातून १, ओरिसातून १ आणि गुजरातमधून १ अशा अन्य प्रवेशिका आल्या होत्या.



पुनर्विकास प्रकल्पाच्या भूमिपूजनापूर्वी श्री साईबाबांची आरती करून आशीर्वाद घेण्यात आले. त्यावेळी संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर व संस्थानचे विश्वस्त मंडळ.

या खुल्या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे ही स्पर्धा **'इंडियन इन्स्टिटयूट ऑफ आर्किटेक्टस्'** आणि **'कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर'** या वास्तुशास्त्रज्ञांच्या भारतीय पातळीवरील मध्यवर्ती व्यावसायिक संघटनांनी ठरवून दिलेल्या सर्व अटी व कार्यपद्धती काटेकोरपणे पाळून भरविण्यात आली होती.

या स्पर्धेचे परिक्षकही तितकेच नामवंत व त्या त्या क्षेत्रातील मान्यवर होते. (१) प्रा. श्री. माधवराव देवभक्त (माजी अध्यक्ष, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ आर्किटेक्टस्), (२) श्री. सदाशिव गोरक्षकर (माजी संचालक, प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय, मुंबई) आणि (३) प्रख्यात आर्किटेक्ट श्रीमती ब्रिन्दा सोमया या तिघांनी बहुमूल्य वेळ देऊन सुमारे दोन-तीन दिवस सर्व प्रवेशिकांचे बारकाईने परिक्षण केले आणि ४९ मॉडेल्समधून पहिल्या तीन मॉडेल्स-कल्पनाचित्रांची निवड केली. दिल्लीच्या मे. माथूर-काप्रे असोसिएटस् प्रा. लि. या संस्थेच्या मॉडेल व कल्पनाचित्रास स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्राप्त झाला. या संस्थेचे मॉडेल परिक्षकांना, भाविक साईभक्तांच्या अधिक सोईचे व संस्थानने नमूद केलेल्या आवश्यक तरतूदी आणि सर्व अटी-शर्ती समाधानकारकपणे पूर्ण करणारे वाटले.

आपले मॉडेल व कल्पनाचित्र तयार करण्यासाठी स्पर्धेत सहभागी सर्व वास्तुशास्त्रज्ञांना संस्थानतर्फे एक व्हीडिओ कॅसेट व शिरडी परिसराची तपशिलवार माहिती देणारी पुस्तिका देण्यात आली होती. व्हिडिओ कॅसेटमध्ये मंदिरातील नित्य आरती, पूजाविधी व त्यावेळी जमणाऱ्या भक्तांची गर्दी तसेच परिसरातील सोई-व्यवस्था, सध्याची दर्शनांची रांग, प्रसादालय, प्रसादवाटप, देणगी कक्ष आदींची माहिती चित्रित करून देण्यात आली होती. तर पुस्तिकेमध्ये शिरडीचे बारमाही हवामान, पाऊस, येणाऱ्या भक्तांची महिनावार संख्या आदी पूरक माहिती देण्यात आली होती.



**अभिषेक विधी**

## दृष्टिक्षेपात स्पर्धा

| | |
|---|---|
| जानेवारी ९६ | विविध राष्ट्रीय वृत्तपत्रांमध्ये स्पर्धेविषयीचे प्रकट आवाहन संस्थानतर्फे प्रसिद्ध. |
| १० फेब्रुवारी ९६ | स्पर्धेचे फॉर्मस् (मोफत) मागविण्याची अंतिम तारीख. *(स्पर्धेच्या २४१ फॉर्मस्‌साठी मागणी आली. ते सर्व पोष्टाने पाठविण्यात आले).* |
| २९ फेब्रुवारी ९६ | फॉर्मस् पूर्ण भरून रु. ५०० च्या डी.डी.समवेत मिळण्याची अंतिम तारीख. *(५०० रु.च्या डी.डी.समवेत स्पर्धेत १८६ स्पर्धकांनी भाग घेतला. त्यांना प्रत्येक एक कॅसेट व एक माहिती पुस्तिका पाठविण्यात आली व अभ्यास-चिंतन करण्यास १ महिन्याचा वेळ देण्यात आला.)* |
| १३-१४ मे ९६ | कॅसेट पाहून व पुस्तिका वाचून स्पर्धेबद्दल निर्माण झालेल्या शंका/प्रश्न स्वीकारून त्यांना सविस्तर उत्तरे व माहिती देण्यात आली. *(प्रश्न कोणाही स्पर्धकाने केलेला असला तरी उत्तरादाखलची माहिती सर्वांनाच पाठविण्यात येऊन सर्वांना समान माहिती उपलब्ध करून देण्यातआली. प्रवेशिका (मॉडेल्स-कल्पनाचित्रे) पाठविण्यास ३१ जुलै अंतिम तारीख देण्यात आली.)* |
| ३१ जुलै ९६ | स्पर्धेसाठी भारताच्या विविध प्रांतातून एकूण ४९ प्रवेशिका मॉडेल्स व कल्पनाचित्रासह दाखल झाल्या. |
| ५ ते ७ ऑगस्ट ९६ | प्रवेशिकांचे (मॉडेल्स व कल्पनाचित्रांचे) मान्यवर परिक्षक श्री. देवभक्त, श्री. गोरक्षकर, श्रीमती सोमया यांच्याकडून मूल्यांकन. |
| ७ ऑगस्ट ९६ | सायंकाळी पत्रकारपरिषदेत स्पर्धेतील विजेत्यांची नावे घोषित करण्यात आली. |
| ८ ते ११ ऑगस्ट ९६ | मॉडेल्स व कल्पनाचित्रांचे सर्वांसाठी विनामूल्य प्रदर्शन दादरच्या मंचेरजी जोशी हॉलमध्ये भरविण्यात आले. |
| ३१ ऑगस्ट ९६ | शिरडी येथे मॉडेल्स-कल्पनाचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन आणि स्पर्धेचा पारितोषिक वितरण सभारंभ संपन्न. *(प्रदर्शन १ सप्टेंबर ते ५ सप्टेंबरपर्यंत सर्वांसाठी खुले.)* |

**विशेष म्हणजे श्री साईबाबांची साधेपणाची राहणी व त्यांची साधेपणाची आवड लक्षात घेऊन पुनर्विकासाचा नवा आराखडा व मॉडेल बनविण्याविषयी संस्थानने सर्व स्पर्धकांना बंधन घातले होते** व सर्व स्पर्धकांनी त्यांचे पालन केले होते.

स्पर्धसाठी संस्थानकडे आलेल्या सर्व मॉडेल्स व कल्पनाचित्राचे सर्वांसाठी संस्थानने मुंबई व शिरडी येथे खुले प्रदर्शन भरविले होते. या प्रदर्शनास साईभक्तांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. हा प्रतिसाद पाहता भक्तांमध्ये समाधी मंदिर परिसराच्या पुनर्विकासाबद्दल केव्हढी उत्सुकता आहे हे लक्षात येतं. मुंबईत ५ ते ७ ऑगस्ट ९७ असे तीन दिवस तर शिरडीत



धार्मिक विधीयुक्त भूमिपूजन.

१ सप्टेंबर ते ५ सप्टेंबर ९७ असे पाच दिवस हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले ठेवण्यात आले होते.

समाधी मंदिर परिसराच्या पुनर्विकासाच्या व्यापक प्रकल्पाच्या कामास श्री. द. म. सुकथनकर यांच्या अध्यक्षते-खालील विश्वस्त मंडळाने दिलेले प्राधान्य व त्या कामासाठी अत्यंत पारदर्शक अशी ही स्पर्धापद्धती, सार्वजनिक न्यास क्षेत्रांमध्ये आदर्श व अनुकरणीय अशी आहे. असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

## कार्याचा दुसरा टप्पा

श्री साईबाबा मंदिर परिसराच्या पुनर्विकासाच्या व्यापक प्रकल्पाचा पहिला भाग - पहिला टप्पा, राष्ट्रीय वास्तुशास्त्रज्ञांची स्पर्धा घेणे व त्यातून अपेक्षित अशा सर्व सोईंनी युक्त अशा मॉडेलची निवड करणे असा होता, तो वरीलप्रकारे अपेक्षेप्रमाणे समाधानकारकरित्या पार पडला. **निवड केलेल्या मॉडेलनुसार परिसराच्या पुनर्विकासाचे बांधकाम करून घेणे हा प्रकल्पाचा दुसरा व अधिक महत्त्वाचा टप्पा होता.** तो टप्पा पहिल्या टप्प्याप्रमाणेच अत्यंत पारदर्शक



भूमिपूजनापूर्वी श्री साइबाबांचे विधीयुक्त पूजन.

कार्यपद्धतीने पार पडावा यासाठी संस्थानच्या विश्वस्त मंडळाने काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यापैकी सर्वात पहिला निर्णय म्हणजे पुनर्विकासाच्या कार्याची त्यांनी तीन प्रकारात सुटसुटीतपणे विभागणी केली ती अशी :

(१) श्री साईबाबांच्या वास्तव्याने पुनित झालेल्या जुन्या ऐतिहासिक वास्तूचे जतन-रक्षण व भक्कमीकरण करणे.
(२) परिसरात आज अस्तित्वात असलेल्या काही इमारतींमध्ये फेरफार करून अधिकाधिक सोईंच्या दृष्टीने त्यांचा नव्या पुनर्विकास प्रकल्पास अनुरूप उपयोग करणे व काही इमारती काढून टाकणे.
(३) भक्तांच्या सर्वांगिण सोई-सुविधांसाठी काही नव्या इमारतींची उभारणी-बांधकाम करणे.

पुनर्विकासाचे हे प्रचंड कार्य कोणाच्या ओळखीने-वशिल्याने कोणातरी बांधकाम कंत्राटदाराला देऊन साईभक्तांच्या मनात संस्थानच्या कारभाराबद्दल नाहक संदेह निर्माण करण्यापेक्षा; हे अवाढव्य व वेगवेगळ्या प्रकारचे निर्माणकार्य करू शकणाऱ्या अनुभवी, सक्षम अशा कंत्राटदारांची एक संक्षिप्त निवड यादी संस्थानने तयार करावी



भूमिपूजनानंतर कुदळ मारून पुनर्विकास कार्याचा श्रीगणेशा झाला.



अवजारांची पूजा करून नारळ वाढवितानाचे क्षणचित्र.

असे विश्वस्त मंडळाने ठरविले.

कंत्राटदारांची ही निवड यादी तयार करण्यासाठी संस्थानने सर्व मोठ्या वृत्तपत्रांमध्ये प्रकट जाहिरात दिली व बांधकाम प्रकल्पाचे साद्यंत विवरण देऊन इच्छुक कंत्राटदारांना आपला अनुभव, मनुष्यबळ, सेवकवर्ग, यंत्रसामुग्रीसज्जता, आणि इतर कंत्राटदारापेक्षा हे कार्य करण्यास ते कशाप्रकारे योग्य आहेत याविषयीचे थोडक्यात स्पष्टीकरण आदी माहितीसह संस्थानकडे अर्ज करण्याचे आवाहन केले. संस्थानची जाहिरात वाचून महाराष्ट्रातील नामवंत अशा ८ कंत्राटदार कंपन्यांनी संस्थानकडे अर्ज केले. आलेल्या अर्जाची तज्ञांकडून छाननी करून घेऊन संस्थानने ८ पैकी ४ जणांना अपेक्षित पुनर्विकास प्रकल्पाचे कार्य करण्यास सक्षम म्हणून निवडले. त्या ४ कंत्राटदार कंपन्यांना त्यांची निविदा भरण्यासाठी योग्य-सक्षम म्हणून निवड करण्यात आल्याचे संस्थानतर्फे कळविण्यात आले. ४ जणांपैकी २ जणांनीच निविदा फॉर्म्स नेले. त्या दोन संस्थांपैकी एका संस्थेने निविदा भरून देण्याच्या अंतिम मुदतीपेक्षा काही दिवस मुदत वाढवून मागितली. त्यांची ही विनंती पुनर्विकास प्रकल्पाचे वास्तूशास्त्रज्ञ श्री. उदय कापरे (दिल्ली) व संस्थानच्या विश्वस्त मंडळाने अमान्य केली. ठरलेल्या मुदतीत, ठरलेल्या अनुषंगिक गोष्टींची सर्वप्रकारे पूर्तता करून संस्थानकडे केवळ एकच निविदा आली आणि ती निविदा होती आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त अशा 'लार्सन अॅण्ड टुब्रो' या कंपनीची! (अधिक माहितीसाठी सोबतची चौकट ''दृष्टीक्षेपात दुसरा टप्पा''पहा)

या एकमेव निविदेचा संस्थानचे सल्लागार वास्तूशास्त्रज्ञ श्री. उदय कापरे यांनी तपशिलवार गहन अभ्यास केला व आपले मत संस्थानच्या विश्वस्त मंडळास कळविले. त्यानंतर विश्वस्त मंडळ व श्री. कापरे यांची लार्सन अॅण्ड टुब्रो कंपनीच्या प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा संस्थानच्या मुंबई येथील कार्यालयात झालीआणि श्री साईबाबा मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाचे निर्माणकार्य लार्सन अॅण्ड टुब्रो या जगविख्यात संस्थेस देण्यात आले. एकूण सुमारे ८ कोटी **रुपयांचे त्यांचे टेंडर संस्थानचे अध्यक्ष व विश्वस्तांनी कंपनीशी वाटाघाटी करून सुमारे १ कोटी रक्कम कमी करून सुमारे रु. ७ कोटीवर मंजूर करण्यात आले. ७ कोटीचे हे अवाढव्य कार्य ही कंपनी केवळ १५ महिन्यात पूर्ण करणार आहे.**



संस्थानचे अध्यक्ष श्री. सुकथनकर, पुनर्विकास प्रकल्पाच्या कार्याचा शिलान्यास करताना.

लार्सन अॅण्ड टुब्रो या कंपनीला बांधकाम-निर्माण क्षेत्रातील प्रदीर्घ व आंतरराष्ट्रीय अनुभव आहे. संस्थेकडे अत्याधुनिक साधनसामुग्री असून अनुभवी व तज्ञ सेवकवर्गाचा मोठा ताफा आहे. नवी दिल्ली येथील बहाई टेम्पल, पुट्टपर्ती येथील हॉस्पिटल - महाविद्यालयाच्या इमारती आणि देशविदेशातील अनेक धार्मिक-सामाजिक बांधकाम प्रकल्प या संस्थेने यशस्वीपणे व वेळेत उभे केले आहेत. अशा अनुभवसंपन्न-जगविख्यात कंपनीद्वारे श्री साईबाबा संथानच्या पुनर्विकास प्रकल्पाचे कार्य होणार असून लाखो साईभक्तांचे अनेक वर्षांचे स्वप्न साकार होणार आहे. संस्थानच्या विश्वस्त मंडळाचा एक महत्त्वाकांक्षी संकल्प यायोगे सिद्धीस जात आहे. अर्थात ही सारी श्री साईबाबांचीच कृपा आहे. श्री साईंचीच लीला आहे.



पुनर्विकास प्रकल्पाचे सल्लागार वास्तूशास्त्रज्ञ श्री. उदय कापरे आणि लार्सन अॅण्ड टुब्रो कंपनीचे अधिकारी श्री. प्रकाश बोरकर

# दृष्टिक्षेपात : दुसरा टप्पा

३१-८-१९९६ श्री साईबाबा समाधी मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पासाठी निवड केलेल्या मॉडेलचे इतर सर्व मॉडेल्ससह शिर्डीत सर्वांसाठी खुले प्रदर्शन.

२५-११-१९९६ प्रथम क्रमांक विजेते वास्तूशास्त्रज्ञ श्री. उदय कापरे यांना प्रकल्पाचे कार्य कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने पुढील कागदपत्रे, नकाशे, परवानग्या आदी कार्य सुरू करण्यास सांगण्यात आले.

१६-४-१९९७ मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाचे अवाढव्य बांधकाम व निर्माण कार्य पूर्ण करण्यासाठी सक्षम अनुभव कंत्राटदारांची संक्षिप्त निवड यादी तयार करण्याचे व त्यासाठी वृत्तपत्रातून प्रकट जाहिरात देण्याचे विश्वस्त मंडळाने ठरविले.

१०-६-१९९७ ''टाईम्स ऑफ इंडिया'' सह प्रमुख वृत्तपत्रांमध्ये सक्षम कंत्राटदारांसाठी प्रकट जाहिरात दिली व २३ जून ९७ पूर्वी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले.

१०-७-१९९७ वृत्तपत्रातील जाहिरात वाचून संस्थानकडे अर्ज आलेल्या ८ कंत्राटदारांच्या अर्जांची संस्थानचे सल्लागार वास्तूशास्त्रज्ञ श्री. कापरे यांनी छाननी केली व ४ कंत्राटदारांना पुनर्विकास कामासाठी सक्षम ठरवून त्यांची यादी करण्यात आली. त्या चार जणांची नावे अशी :-

१) मे. सेठना कन्स्ट्रक्शन, मुंबई. २) मे. असोका बिल्डकॉन, नाशिक.

३) मे. लार्सन ॲण्ड टुब्रो लि., मुंबई. ४) मे. बी. जी. शिर्के, पुणे.

४-८-१९९७ संस्थानतर्फे तयार करण्यात आलेल्या कंत्राटदारांच्या शॉर्टलिस्ट मधील वरील सर्व चार कंत्राटदारांना समाधी मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाचे टेंडर दस्तावेज घेऊन जाण्यासाठी पत्रे पाठविण्याचे ठरले.


२१-१०-१९९७ चार जणांपैकी केवळ लार्सन ॲण्ड टुब्रो, मुंबई आणि अशोका बिल्डकॉन, नाशिक या दोघांनीच टेंडर फॉर्म नेले. त्यांना टेंडर सादर करण्यासाठी २९ नोव्हेंबर १९९७ ही अंतिम मुदत देण्यात आली.

३०-११-१९९७ दोन जणांपैकी फक्त लार्सन ॲण्ड टुब्रो, मुंबई या एकाच संस्थेने आपले टेंडर मुदतीत भरून संस्थानकडे पाठविले. त्या टेंडरचे, संस्थानचे सल्लागार वास्तुशास्त्रज्ञ श्री. कापरे यांनी तपशीलवार अध्ययन केले व लार्सन ॲण्ड टुब्रो कंपनीस विश्वस्त मंडळाशी चर्चा करण्यास बोलविण्यात आले.


२०-१२-१९९७ विश्वस्त मंडळ, संस्थानचे सल्लागार वास्तुशास्त्रज्ञ श्री. कापरे आणि लार्सन ॲण्ड टुब्रो कंपनीचे चार प्रतिनिधी सर्वश्री डी. बी. मोदी, प्रकाश बोरकर, एस. के. रॉय आणि संजीवकुमार यांची सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती मूळ सुमारे ८ कोटी रुपये रक्कमेचे टेंडर सुमारे १ कोटी रुपये कमी करून सुमारे रु. ७ कोटी कमाल मर्यादित मंजूर करण्यात आले.

१८-१-१९९८ मंदिर परिसर पुनर्विकास कार्याचा श्रीगणेशा धार्मिक विधीयुक्त भूमिपूजन करून करण्यात आला. संस्थानच्या परंपरेनुसार संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर यांच्या हस्ते व विश्वस्त मंडळाच्या उपस्थितीत हा भूमिपूजन समारंभ अत्यंत साधेपणाने झाला. स्वप्नपूर्तीच्या कार्याचा शुभारंभ झाला.

# पुनर्विकास प्रकल्पाचे मॉडिल



# पुनर्विकास प्रकल्पाचा आराखडा



## असे भक्त, अशी भक्ती

# साईभक्त स्व. गोपाळराव देशपांडे

- प्रा. सौ. हेमलता जोशी, पुणे



❖❖❖

**रामनवमीच्या उत्सवात द्वारकामाईवर निमोणकर यांच्या घराण्याच्यावतीने, गाजतवाजत आणून निशाण लावले जाते. त्या निमोणकर घराण्याची साईभक्ती सर्व साईभक्तांना परिचित आहे. त्या घराण्यातील स्व. गोपाळराव देशपांडेंचा प्रा. सौ. जोशी यांनी करून दिलेला परिचय**

❖❖❖

इंग्रजीमध्ये एक सुप्रसिद्ध वचन आहे. "Some are born great, some achieve greatness and greatness is thrust on some ! काही माणसे जन्मजातच मोठी असतात, काही कर्तृत्वाने मोठी होतात तर काहींवर मोठेपण लादले जाते. काही माणसे आपल्या आयुष्यात अनेक मूल्यांना, आदर्शांना जपतात आणि इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करतात. इतरांना स्फूर्ती देतात. आदर्शांना जपता जपता स्वतःच आदर्श स्थान होतात.

ज्यांच्यामुळे जीवनाला आकार आला, आयुष्याला वेगळी कलाटणी मिळाली, नवी दिशा मिळाली, असे माझे वडील अहमदनगर येथील सुप्रसिद्ध वकील श्री. गोपाळ सोमनाथ देशपांडे हे माझे आदर्शस्थान स्फूर्तीस्थान आहेत. माझे बाबा म्हणजे माझे गुरु, मार्गदर्शक आणि प्रेरक आहेत. आयुष्यात जे काही यश मिळवले, त्याच्यामागे वडिलांचा आशीर्वाद आणि संस्कार आहेत. ही फार मोठी संचिताची पूर्व पुण्याईची बाजू आहे असे मला मनोमन वाटते. आज हा लेख लिहिताना ते या जगात नाहीत हे प्रकर्षाने जाणवतंय. मनात भावनांचे तरंग उठत आहेत. हृदयात जपून ठेवलेली त्यांची स्मृती एखाद्या अत्तराच्या कुपीसारखी जपून ठेवली आहे. डोळ्यात अश्रूंची दाटी झाली आहे. एखाद्या रेशम लडीसारख्या आठवणी उलगडत आहेत. डोळ्यांसमोर माझ्या बाबांचा चेहरा, व्यक्तिमत्व नव्याने साकार होत आहे.

श्री साईबाबांच्या सहवासाचा आणि आशीर्वादाचा कृपाप्रसाद त्यांना लहानपणापासूनच मिळालेला होता. हे भाग्य लाभणे ही फार मोठी संचिताची आणि पूर्वपुण्याईची गोष्ट होय.

खरंच, कसे होते माझे बाबा ? प्रसन्न व्यक्तिमत्व नैसर्गिकच होत. पण त्याच्या जोडीला साथ मिळाली ती उत्कट आशावादाची, आदर्श मूल्यांची आणि ध्येयवादाची. त्यांचे संपूर्ण जीवन म्हणजे उत्तम संस्कारांची, सुंदर विचारांची चिरंतन गाथाच होय. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे सुंदर पैलू एखाद्या टीपकागदासारखे लहानपणापासून टिपण्याचा मी मनोमन प्रयत्न केला. आम्हा सर्व भावंडांवर त्यांच्या आचार-विचारांचे फार मोठे संस्कार झाले. त्यांच्याबद्दल कितीही कृतज्ञता व्यक्त केली तरी ती अपुरीच आहे.

अहमदनगर येथील कोर्टामध्ये वडिलांनी ज्येष्ठ सरकारी वकील या नात्याने आपली कारकिर्द गाजवली. अनेक मोठमोठे खटले चालवले. अस्खलीत इंग्रजीमध्ये मोठ्या थाटात आर्ग्युमेंट करायची त्यांची पद्धत अभूतपूर्व असे. काळा गाऊन घालून सुंदर इंग्रजीमध्ये त्यांच्या वाणीचा ओघ सुरू झाला की कोर्टामध्ये न्यायाधीश, इतर वकील वर्ग एखाद्या चित्रासारखा स्तब्ध होत असे. त्यांचे कायद्याचे सखोल ज्ञान, केसचा काळजीपूर्वक केलेला अभ्यास आणि इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व खरोखरीच फार उत्तम दर्जाचे होते. भावी आयुष्यात या क्षेत्रात करियर करणाऱ्या सर्वांनी त्यांच्यापासून स्फूर्तीच मिळाली आहे. साक्षीदारांची उलट तपासणी करण्याचे कसबसुद्धा अतिशय मार्मिक आणि वाखाणण्यासारखे असे. त्यांच्या बरोबरीला विरुद्ध पक्षाच्या वकील महाशयांना मिश्किल कोपरखळ्या देणं, विनोद, नाट्यमयता अशा अनेक गोष्टींनी त्यांच्या आर्ग्युमेंटला एक वेगळीच धार येत असे. लहानपणी

आम्ही मोठ्या उत्साहाने कोर्टामध्ये जाऊन वडिलांचे आर्ग्युमेंट ऐकत बसायचो. त्यावेळी मला माझे बाबा एखाद्या श्रेष्ठ आणि ज्येष्ठ उत्तुंग पर्वतासारखे महान वाटायचे. हे त्यांचे स्वरूप मी कधीही विसरणार नाही. या आठवणी चिरंतन आहेत, अजरामर आहेत.

त्यांच्या रुबाबदार व्यक्तिमत्वाचा आणि उत्तम इंग्रजी भाषेचा फार मोठा पगडा माझ्या मनावर लहानपणापासून झाला. इंग्रजी साहित्य आणि उत्तम इंग्रजीमध्ये बोलता येण्याचे कौशल्य आत्मसात करण्याची जिद्द आणि स्फूर्ती त्यांच्यापासूनच मिळाली ! त्यांचे विचार आणि त्यांचे संस्कार म्हणजे जणू असंख्य नक्षत्रांचं देणंच !

## 'निमोण' गावी जन्म

माझ्या वडिलांचा जन्म मकर संक्रांतीला म्हणजे १४ जानेवारी १९१४ साली संगमनेर तालुक्यातील 'निमोण' या गावी वतनदार देशपांडे (निमोणकर) घराण्यात झाला. पूर्वापार चालत आलेली वतनदारी असल्यामुळे गावात प्रतिष्ठा होती. त्यांचे आजोबा श्री. नानासाहेब निमोणकर देशपांडे हे ब्रिटिशांच्या काळात संगमनेर येथे मॅजिस्ट्रेट होते, तर वडील श्री. सोमनाथ शंकर देशपांडे सी. आय. डी इन्स्पेक्टर होते. घरामधील वातावरण तसे शिस्तीचे, धार्मिक संस्काराचे. वडील आणि आजोबांना आध्यात्मिकतेची आवड होती.

कै. नानासाहेब निमोणकर आणि त्यांची पत्नी या दोघांनीही आपल्या आयुष्यातील शेवटचा काळ शिर्डीच्या साईबाबांच्या सेवेत आणि सान्निध्यात व्यतीत केला. शिर्डीच्या साईबाबांच्या अत्यंत निकटवर्तीय भक्त मंडळीत नानासाहेबांचा उल्लेख केला जातो. उदा. नानासाहेब चांदोरकर, नूलकर, माधवराव देशपांडे (शामा), श्रीमंत बुटी आणि नानासाहेब निमोणकर **श्री. साईबाबांनी रामनवमीच्या दिवशी द्वारकामाईवर निशाण लावण्याची आज्ञा श्री नानासाहेब निमोणकरांना केली. त्या घटनेला आज १०० वर्ष होऊन गेली. त्याचे पालन श्री नानासाहेबांनी श्री. सोमनाथ शंकर देशपांडे आणि माझ्या वडिलांनी आयुष्यभर अत्यंत निष्ठेने आणि श्रद्धायुक्त अंतःकरणाने केले. दर रामनवमीला होणारा हा सोहळा फार सुंदर आणि भावपूर्ण असा असतो.**

सर्व प्रथम समाधीवर या निशाणाची पूजा होते. उत्सवास प्रारंभ होतो. त्यानंतर मोठ्या थाटाने या निशाणांची आणि साईबाबांच्या रथाची मिरवणूक निघते. वर्षभर ही निशाणे द्वारकामाईवर फडकत रहातात. हा उल्लेख विशेषत्वाने करण्याचे कारण म्हणजे लहानपणापासून माझ्या वडिलांना श्री साईबाबांच्या कृपेचा लाभ मिळालेला आहे. वडील आणि आजोबा यांच्याबरोबर ते अनेक वेळा साईबाबांच्या दर्शनास



जात असत. साईबाबा कसे दिसायचे ? असा प्रश्न आम्ही वडिलांना अनेक वेळा विचारला असेल. तेही मोठ्या उत्साहाने सांगायचे, ''साईबाबांचे व्यक्तिमत्व फारच भव्य होते. पांढरी शुभ्र कफनी, डोक्याला बांधलेला रुमाल आणि त्यांची मुद्रा सतत प्रसन्न असे. द्वारकामाईच्या दारात उभे राहून गावातील सर्व लहान मुलांना ते खाऊ वाटत असत. मला अनेक वेळा मांडीवर बसवून त्यांनी खाऊ भरवलेला आहे. ही आठवण सांगताना माझ्या वडिलांचा चेहरा अत्यंत आनंदाने आणि भक्तिभावाने फुलून येत असे.

माझ्या वडिलांचे महाविद्यालयीन शिक्षण पुण्यात झाले. एल्. एल्. बी. झाल्यानंतर अहमदनगर, संगमनेर ह्या ठिकाणी वकिली व्यवसायाला सुरुवात केली आणि नंतर सरकारी वकील म्हणून काम केले. कोर्टातील केसेस लढवताना ते तन्मय होत असत. प्रत्येक केसचा अभ्यास अगदी सखोल करून मगच मांडण्याची त्यांची पद्धत होती. कोर्टामधील आर्ग्युमेंट ते नेहमी इंग्रजीतच करीत असत. त्यांची अनेक आर्ग्युमेंटस् गाजलेली आहेत. मी स्वतः कोर्टामध्ये जाऊन ती ऐकलेली आहेत. इंग्रजी भाषेचा डौल, सफाई, अलंकार प्रचुरता, विषय मांडण्याची पद्धत या सर्वांचा तो एक आदर्श वस्तुपाठच असे. ज्युनियर वकिलांना त्यांच्याकडून खूप शिकायला मिळत असे. ते सर्वजण त्यांना फार आदरपूर्वक वागवीत. काळा गाऊन घालून सफाईदार इंग्रजीत केस लढविणारे माझे वडील खऱ्या अर्थाने स्फूर्तिदायक, प्रेरणा देणारे गुरु ठरले. त्यांच्यामुळेच इंग्रजी साहित्याची गोडी

लागली.

घरी सतत माणसांचा राबता. नातेवाईक, पाहुणे, मित्र परिवार या सर्वांचे येणे-जाणे. माझे आईवडील मोठ्या हसतमुखाने सर्वांचे आदरातिथ्य करीत असत.

बाबांचा स्वभाव अतिशय चेष्टेखोर मार्मिक बोलण्याचा असे. त्यामुळे ते नगर बार असोसिएशनमध्येसुद्धा फार लोकप्रिय होते. अनेक सब इन्स्पेक्टर्सना वडिलांनी फार चांगले मार्गदर्शन केलेले आहे.

वडिलांचे संस्कृत आणि ज्योतिषशास्त्रावर प्रभुत्व होते. अमरकोश, ब्रह्मणस्पति सूक्त, वैदिक सूक्त, पुरुष सूक्त यांचे नित्यनियमाने पठण करीत असत. त्यांची देवपूजा आणि खड्या सुरात केलेले मंत्रोच्चार यांनी वातावरण भारले जात असे. त्यांच्या घनगंभीर आणि खड्या आवाजातील रुद्र पठणाचा उत्तम संस्कार आमच्यावर झालेला आहे. ते स्वर सातत्याने कानात घुमत असतात. रुद्र म्हणताना ते एवढे तन्मय होत असत की भोवतालच्या परिस्थितीचा विसर पडे. त्या सुंदर संस्कृत उच्चारांची लय आणि भावनोत्कटता आजही अंतःकरण रोमांचित करतात. याचा परिणाम असा झाला की, आम्ही लहानपणापासूनच गणपती अथर्वशीर्ष, शंकराचार्यांचे शिवमानस स्तोत्र श्री सूक्त, पुरुष सूक्त, रामरक्षा पाठ म्हणू लागलो. संस्कृत विषयांची गोडी उत्पन्न झाली. घरामध्ये आम्ही सर्वजण ही स्तोत्रं मोठ्या आवडीने म्हणू लागलो.

**पैठण वृद्धेश्वरची पदयात्रा**

त्यांचे सर्वात उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे सतत २२ वर्षे केलेली पैठण ते वृद्धेश्वर ही पदयात्रा. वृद्धेश्वर हे पाथरर्डी जिल्ह्यातील फार प्राचीन स्वयंभू शिव मंदिर आहे. नवनाथांच्या पोथीत त्याचा म्हातारदेव या नावाने उल्लेख आहे. चारही बाजूंनी डोंगर आणि हिरव्यागार झाडीने वेढलेले हे प्राचीन शिवमंदिर माझ्या वडिलांचे खऱ्या अर्थाने स्फूर्तीस्थान आणि उपासना मंदिर ठरले. नाथपंथीय मच्छिंद्रनाथांनी येथे यज्ञ करून सर्व देवांना आमंत्रित केले. भगवान शंकर साक्षात प्रगट झाले. त्याची साक्ष म्हणजे आज मंदिरात असलेले स्वयंभू शिवलिंग म्हणजेच भगवान वृद्धेश्वर! त्या कुरळ्या जटांमधून पाणी सतत वाहत असते. माझे वडील आणि त्यांचे मित्र पैठणला ज्ञानेश्वरांचे दर्शन घेऊन पाण्याची कावड घेऊन महाशिवरात्रीच्या दोन दिवस अगोदर निघत असत. नंतर पायी 'ॐ नमः शिवाय' या मंत्राचा घोष करीत वृध्देश्वरला महाशिवरात्रीला पोहोचत असत. त्या दिवशी बाबांच्या रुद्रपठणाने सर्व गाभारा पवित्र होत असे. त्यांचे घनगंभीर उच्चार, तन्मयता एखाद्या सजीव चित्रासारखी डोळ्यांसमोर उभी आहे. भगवान शंकराची उपासना त्यांनी आयुष्यभर केली.

ज्ञानेश्वरी, उपनिषदांचे वाचन तर नित्याचे. 'पसायदान' म्हणताना त्यांच्या डोळ्यात अश्रू येत असत. वडिलांचा दृष्टिकोन अतिशय आनंदी, सकारात्मक होता. साधेपणाची, मनमोकळ्या स्वभावाच्या माणसात रमण्याची आवड होती. त्यांचा उत्साह कायम इतरांना संजिवनी देणारा असे. घरातील मंगल कार्य, सार्वजनिक समारंभ, वकिलांच्या बारमध्ये कुठेही असो, ते सतत आनंद आणि हसतमुख वावरत असत. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा हा फार मोठा पैलू होता. याच्या जोडीला त्यांचा ज्योतिषशास्त्राचा अभ्यास आणि व्यासंग याच्यामुळे त्यांच्या लोकप्रियतेत भरच पडत गेली. मित्रपरिवार वाढतच गेला. अनेकांना त्यांनी वैयक्तिक समस्यांवर मार्गदर्शन केले.

जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर उत्तम विचार, उत्तम आचार आणि उत्तम निरोगी देहसंपदा असायलाच पाहिजे असा त्यांचा ठाम विश्वास होता.

७६ व्या वर्षी त्यांना हृदयविकाराचा पहिला झटका आला. नंतर तीनच वर्षांनी दुसराही आघात झाला. अनेक वेळा हॉस्पिटलमध्ये जावे लागले. पण अत्यंत धीरोदात्तपणे त्यांनी सर्व आजारपणांना तोंड दिले. एखाद्या शूर वीराप्रमाणे झुंज दिली. १९ डिसेंबर १९९७ या दिवशी वयाच्या ८४ व्या वर्षी ते मृत्यूला सामोरे गेले. त्यांच्या स्मृती, त्यांचे विचार, त्यांचे खळखळते हास्य, त्यांचे घनगंभीर मंत्रोच्चार, त्यांचे शब्द - अशा अनेक माध्यमातून जाणवते की, ते आमच्यातच आहेत.

ooo

## साईनाथ सद्‌गुरु

साईनाथ सद्‌गुरू दयाळा साईनाथ सद्‌गुरू ।
तुझ्या कृपेने भवसागर हा अलगद पार करू ॥धृ॥

तूच आम्हाला शरणस्थान हे तुजला नित्य स्मरू ।
चरणयुगुल तव हृदयी अमुच्या सदैव आम्ही धरू ॥१॥

कधी आपदा जरी पातल्या तुला न मुळी विसरू ।
तुझ्या नामनौकेच्या योगे त्यातूनही उद्धरू ॥२॥

श्रद्धा सबुरी दोन शब्द हे अर्थाला किती गुरु ।
आचरणी आणून जीवनी सुखा सदैव भरू ॥३॥

तू त्राता तू पिता आम्हाला तवपदी हे लेकरू ।
जो जे वांछी ते तू देशी असशी कल्पतरु ॥४॥

तूच कृपाळा रक्ष आमुच्या प्राणांचे पाखरू ।
परिवारासह शरण तुला मी नको अम्हां अव्हेरू ॥५॥

**- सौ. सुषमा दिनकर देशपांडे**
**कोथरूड, पुणे.**

पुण्य स्मरण

आद्य शंकराचार्य जयंती निमित्त

# श्री शंकर भगवत्पाद

पू. महास्वामी चंद्रशेखरेंद्र सरस्वती



आद्य शंकराचार्यांनी अवतार घेतल्यामुळे अद्वैततत्त्वज्ञान आणि ऋषीमुनींचे अवतारकार्याचे महत्त्व पुंन:प्रस्थापित झाले आणि त्यामुळेच श्री रामनवमी, श्री. नृसिंह जयंती, 'श्रीकृष्ण जयंती (जन्माष्टमी), मकर संक्रांती, शिवरात्री आणि इतर पवित्र सण आणि धार्मिक उत्सव आपण साजरे करु शकलो. दरवर्षी वसंत ऋतुतील वैशाख शु ॥ पंचमीस श्री शंकराचार्य जयंती येते, वसंत ऋतुत बहर येणाऱ्या शुध्द मोगऱ्याच्या किंवा वासंतीच्या फुलातील सुगंधाप्रमाणे अध्यात्मिक शक्तीचा सुगंध सर्वत्र दरवळो !

शंकर म्हणजे कोण ? शंकर म्हणजे 'लोकशंकर' ! त्यांचे अवतारकार्य अखिल जगताचे कल्याणासाठी आहे. ते स्वत: शंकर आहेत. शिव म्हणजे मंगल आहेत. शंकर या नांवातील 'शम' याचा अर्थ काय आहे ? 'शम' म्हणजेच सुख, आनंद, शाश्वत सुख ! बृहदारण्योपनिषद मध्ये याचा उल्लेख 'प्रिय' असा आहे. सामान्यत: हा आनंद किंवा 'प्रिय' कशात आहे ? कोठे मिळू शकेल ? हे या जगांतील लोकांना समजत नाही आणि म्हणूनच ते शारीरिक आणि मानसिक दु:खाने पीडित

❖❖❖

**अद्वैत तत्त्वज्ञानाचे पुनर्संस्थापक आद्य शंकराचार्य यांचे महनीय कार्य भारतीय एकात्म संस्कृतीचे महान दर्शन आहे. यंदाच्या वर्षी ३० एप्रिल रोजी आद्य शंकराचार्य जयंती आहे. त्यानिमित्त आद्य शंकराचार्यांच्या दिव्य कार्याबद्दल, त्यांच्याच पीठावरील एका उत्तराधिकाऱ्याने केलेले पुण्यस्मरण**

❖❖❖

आहेत. त्यांच्या या परिस्थितीची श्री भगवत्पाद शंकरांना कणव आली. मनुष्याने शाश्वत सुखाचा, परमानंदाचा किंवा आत्मानंदाचा शोध आणि स्वानुभव घ्यावा अशी आद्य शंकराचार्यांची तीव्र इच्छा होती.

## ब्रह्म सत्य

जगातील दु:खातून मुक्त होऊन शाश्वत आनंदाचा आद्य शंकराचार्यांनी अनुभव घेतला. तो शाश्वत आनंद किंवा सुख कोठे आहे ? आपल्या स्वत:चे ठिकाणी तो शाश्वत आनंद आहे. सुख आहे. आपणाजवळच सर्व कांही आहे. आपण स्वत:च ब्रह्म आहोत. त्या ब्रह्माचे ज्ञान आपण प्राप्त करावयाचे आहे. त्याचा शोध आपणांस घ्यावयाचा आहे. प्रत्येक गोष्टीचे कारण ब्रह्म आहे. ब्रह्म हेच कार्य व कारण आहे. कार्य व कारण हे एकच आहेत. प्रत्येक गोष्ट सुख, आनंद आहे. या शाश्वत सुखाचा, आनंदाचा आपण अनुभव घेऊ या !

जगातील प्रत्येक गोष्टीचा आपल्याशी संबंध असल्यामुळे ती आपणास प्रिय असते. अखेर प्रत्येकास स्वत:बद्दल प्रेम असते. आपण स्वत: ब्रह्मातून निराळे नाही. ब्रह्म आणि आपण स्वत: एकच आहोत याची अनुभूती येणे म्हणजेच ब्रह्मानंद, परमानंद होय. परमात्मा एकच आहे, प्रत्येक गोष्ट ब्रह्म आहे आणि सर्व काही एकच आहे ही शंकराचार्यांची शिकवण आहे. वेदांची हीच शिकवण आहे. आधिभौतिकवाद्यांचे मत असे आहे की, जग हेच सत्य आहे. आणि ब्रह्म अस्तित्वातच नाही. न्याय तर्कशास्त्रज्ञांचे आणि इतर द्वैतवाद्यांचे असे म्हणणे आहे की, जगत् आणि ब्रह्म दोन्हीही सत्य आहे. ब्रह्म हेच सत्य आहे

आणि जगास ब्रह्माशिवाय अस्तित्व नाही, हीच शंकराचार्यांची शिकवण आहे., ब्रह्मं सत्यं जगन्मिथ्या ! शंकराचार्यांचे तत्वज्ञानाचा उदय झाल्यानंतर आणि प्रसार झाल्यानंतर, ज्याप्रमाणे सूर्योदयानंतर चांदण्यांच्या प्रकाशाचा लोप होतो, तद्वत आधीच्या सर्व तत्वप्रणाली लोप पावल्या.

पूर्वेकडे, पश्चिमेकडे, दक्षिणेकडे किंवा उत्तर वाहिनी नद्या ज्याप्रमाणे शेवटी सागरास मिळतात, त्याचप्रमाणे भक्ति मार्ग, उपासना मार्ग आणि नैतिक मूल्यांची जोपासना इ. विविध मार्ग आणि तंत्र, आचार योग आणि समाधि इ. भिन्न मार्ग शेवटी अदृष्य अशा एकाच आत्म्यामध्ये, शाश्वत आनंदामध्ये विलीन होतात. अखेर सर्व मार्गांचे साध्य एकच आहे परमात्म्यामध्ये विलीन होणे, परमानंद प्राप्ती !

आत्मविनाश आणि नरकाप्रत नेणारी नरकाची तीन द्वारे आहेत. वासना, क्रोध आणि धनाचा लोभ. आणि म्हणूनच या तिघांचा त्याग करावयास हवा. या तीन द्वारातून बाहेर पडल्यानंतर उध्दाराचा मार्ग दिसेल आणि शेवटी अंतिम ध्येय प्राप्त होईल. परंतु शास्त्राने सांगितलेला वरील मार्ग सोडून एखादा जर आपल्याच मनाप्रमाणे स्वैर आणि ऐहिक सुखाचाच मार्ग धरेल, तर त्यास आत्मज्ञानही होणार नाही आणि अंतिम ध्येयाची प्राप्तीही होणार नाही.

## भारतभर पदयात्रा

वेदातील जतन केलेली सत्ये आपल्या शंकर भाष्यातील गूढार्थ समजेल अशा सोप्या भाषेत विशद करीत भगवत्पादांनी दक्षिणेकडील रामेश्वर ते उत्तरेकडे हिमालयापर्यंत भारताची पदयात्रा केली. नद्या, पवित्र स्थाने, खेडी, गांवे आणि मंदिरे शंकराचार्यांचे पदस्पर्शाने पवित्र झाली आहेत.

भगवत्पाद शंकराचार्यांनी मंदिरात स्थापन केलेल्या यंत्रांनी आणि मंत्रांनी त्याचप्रमाणे त्यांनी प्रार्थनापर रचलेल्या देवतांच्या स्तोत्रांनी त्यांचे महत्व वृध्दिंगत झाले आहे. असे एकही पवित्र स्थान नाही की जे भगवत्पादांचे पदस्पर्शाने पूनीत झाले नाही. भारतातील कित्येक भागातील लोक मोठ्या गौरवाने सांगतात की त्यांचे गांवातील मंदिरे भगवत्पादांचे परस्पर्शाने पवित्र झाली आहेत. एवढेच नव्हे तर त्यांनी स्थापन केलेल्या यंत्रांनी त्यांचे पावित्र्य वाढले आहे. जेथे जेथे वेदाभ्यास केला जात असे अशा सर्व ठिकाणी व गुरशिष्य परंपरा अस्तित्वात होती आणि आजही आहे अशा सर्व ठिकाणी शंकरभाष्यांचा मोठ्या भक्तिभावाने अभ्यास केला जातो व अध्यापन केले जाते.

आधुनिक शास्त्रातील प्रगती हीच जीवघेणी शस्त्रे तयार करण्यास कारणीभूत आहे. आणि हीच शस्त्रे सर्वनाश करणारी असल्यामुळे सर्व जगांस सतत चिंतेचा विषय झाला आहे. शास्त्रातील प्रगतीचा हा एक दुष्परिणाम बाजूला ठेवला आणि थोडा शांतपणे विचार केला तर असे स्पष्ट होईल की, ही शास्त्रीय प्रगती मानवांस शांतीचाही मार्ग दाखवू शकेल. ५० वर्षापूर्वी शास्त्रज्ञांना असे वाटत होते की वस्तू कित्येक अणूंनी तयार झालेली आहे. परंतु आज त्यांना हा फरक नाही हे लक्षात आले आहे. आता एकाच शक्तीपासून (एनर्जी) त्याची निर्मिती झालेली आहे या निर्णयाप्रत ते आलेले आहेत. यावरुन असे दिसते की, आधुनिक शास्त्रज्ञांना आद्य शंकराचार्यांनी प्रचार आणि प्रसार केलेले अद्वैत तत्व (नॉन डिफरन्स) मान्य झाले आहे. विशेषत: आईन्स्टाईन, श्री. जेम्स जीन्स, एडिंग्टन यांना अद्वैत तत्व मान्य आहे. आणि आधुनिक शास्त्रज्ञांची ही आधुनिक विचारसरणी लोकांच्या मनावर ठसेल व जगांस शांती लाभेल. जगांतील मानवांना, विचारवंतांना, पुढाऱ्यांना, प्रशासकांना आणि बलवान राष्ट्रातील विचारवंतांना पटेल की, जगांतील इतर मानवामध्ये आणि त्यांचे मध्ये फरक नसून एकात्मतेची भावना निर्माण होईल. भेदाभेद नष्ट होतील. दुसऱ्या राष्ट्रातील दु:खी आणि संकटग्रस्त नागरिकांचे विषयी सहानुभूती निर्माण होईल व अशा तऱ्हेने जागतिक शांतता प्रस्थापित करण्याचा ते आटोकाट प्रयत्न करतील व शांती लाभेल.

***(या संदर्भात इराकचे ज्वलंत प्रश्नावरुन ज्या घडामोडी होत आहेत त्यावरुन स्पष्ट होईल की, सर्वनाश करणारी अण्वस्त्रे आणि जैविक अस्त्रे (केमिकल वेपन्स) यापासून उद्‌भवणारा युध्दाचा संभाव्य धोक्याची कल्पना जगातील राष्ट्रांना आलेली आहे. आणि विचारवंत राष्ट्रे युध्द होऊ नये ते टळावे म्हणून आटोकाट प्रयत्न करीत आहेत.)***

अनादि श्रुतीने जे 'अद्वैत' सत्य प्रतिपादले आहे ते आता आधुनिक शास्त्रज्ञ सुध्दा मान्य करु लागले आहेत. या सत्यास आद्य शंकराचार्यांनी उजाळा दिला आणि त्याचे प्रसारासाठी जीवन समर्पित केले. या अद्वैताचा विचारवंतांनी, विद्वानांनी प्रामाणिकपणे आणि कळकळीने आपल्या परीने प्रसार करावा. आज अशांतीने अखिल जगतास ग्रासले आहे. अद्वैत रुपी संजीवनीने अशांतीचा अंध:कार दूर होऊन अखिल जगतास शंकर या नांवातील शम् म्हणजेच शाश्वत शांती आणि समाधानाचा अनुभव मिळावा, सर्वत्र शांती प्रस्थापित होवो असा संकल्प आजचे 'शंकराचार्य जयंतीचे' दिवशी आपण करुया !

## अलौकिक बुध्दिमत्ता

**शास्त्रं शरीरमीमांसा देवस्तु परमेश्वर: ।**
**आचार्य: शंकराचार्य: सन्तु जन्मनि जन्मनि ॥**

शास्त्र म्हणजे शरीरमीमांसा हा माझा अभ्यास आहे. मी ज्याचे पूजन करतो तो साक्षात् परमेश्वर आहे. जन्मोजन्मी आचार्य माझे गुरु असोत. पुनर्जन्म येऊ नये हे प्रत्येक साधकाचे ध्येय असते. पुनर्जन्मापासून मुक्ती कशी मिळवता येईल याविषयी सर्व शास्त्रे मार्गदर्शन करीत असतात. भगवत्पाद शंकर सुध्दा म्हणतात- ■ पुनरपि जननम् पुनरपि मरणं इ.

परंतु मी जो श्लोक वर उद्धृत केला आहे तो सर्व साधकांचे ध्येयाशी, साध्याशी विसंगत वाटेल ! पुनर्जन्म नसावा याचे उलट पुनर्जन्म मिळावेत अशी प्रार्थना वरील श्लोकांत अभिप्रेत आहे. तथापि या प्रार्थनेमध्ये तीन अटींचा समावेश आहे. १) प्रत्येक जन्मात शरीरमीमांसा हाच माझा विश्वास आणि धारणा असेल, अभ्यास असावा. २) ज्या देवतेची मी प्रार्थना, किंवा उपासना करेन तो 'परमेश्वर' असेल. ३) ज्या गुरूंचा आश्रय मला मिळणार ते शंकराचार्य असावेत. वरील तीन गोष्टी जर मला पुनर्जन्मात मिळणार असतील तर कितीही पुनर्जन्म मिळोत. श्री शंकर भगवत्पादांचे कोट्यावधी शिष्यांपैकी एकाने वरीलप्रमाणे प्रार्थना केली आहे. आद्य शंकराचार्यांनी 'शिवानन्दलहरी' स्तोत्रामध्ये असेच विचार व्यक्त केले आहेत.

**नरत्वं देवत्वं नगवनमृगत्वं मशकता**
**पशुत्वं कीटत्वं भवतु विहगात्वादि जननम् ।**
**सदा त्वत्पादाब्ज - स्मरण परमानंदलहरी**
**विहागसवतं चेत् हृदयमिह किं तेन वपुषा ॥**

शंकरा ! मला कोणताही जन्म असू दे ! मनुष्याचा, देवाचा, पर्वताचा किंवा अरण्यातील पशूंचा, किटकाचा अथवा पक्ष्याचा, कोणताही जन्म येवो. महादेवा, माझे हृदय सर्वकाळ तुमच्या चरणकमलांच्या स्मरणाने होणारा जो महान् आनंद, त्या आनंदाच्या तरंगात विहार करण्यात निमग्न होऊन राहो, अशी माझी मनीषा आहे. (माझे अंत:करण तुमच्या चरणकमली रमले की माझे काम झाले ! मग कोणताही जन्म मिळो मला त्याची पर्वा नाही !... किं तेन वपुषा ?)

शरीर कुरुप आणि अगदी तिरस्करणीय असले तरी चालेल, परंतु अंत:करण मात्र शुध्द आणि ईश्वरचरणी सदा रत असावे. देह सुंदर आहे पण अंत:करण मात्र भक्तिविरहीत असेल तर मानवी स्वभावाची उन्नती होण्याऐवजी अध:पतनच होईल. सज्जनांना पुनर्जन्माची चिंता नसते कारण ऐहिक सुखाने अथवा आकर्षणाने चित्त विचलित होऊ नये यासाठी ते नित्य काळजी घेत असतात.

परमेश्वर दयाळू आहे. आपणा सर्वांवर त्याचे प्रेम आहे. परमेश्वराची भक्ती हाच मोक्षप्राप्तीचा उत्तम मार्ग आहे.



परमेश्वरप्राप्ती आपणांस सद्गुरुमुळेच होते. सद्गुरु आपणांस योग्य ते मार्गदर्शन करतात. सद्गुरु आपले उत्तम मित्र आहेत. तत्वज्ञानी आणि स्थितप्रज्ञ आहेत, उत्तम मार्गदर्शक आहेत.

वर उल्लेख केलेल्या श्लोकामध्ये शिष्यास 'भगवत्पाद शंकराचार्य' हेच 'गुरु' म्हणून अभिप्रेत आहेत. आचार्य ही संज्ञा श्री शंकराचार्यांचे बाबतीत सार्थ होय ! भीष्म आणि द्रोण यांनासुध्दा आचार्य ही संज्ञा लावतात. जसे भीष्माचार्य, द्रोणाचार्य, याचप्रमाणे सायंनाचार्य, उदयनाचार्य, भास्कराचार्य इ. वास्तविक प्रत्येक शास्त्राचे शिक्षण देणाऱ्यास आणि पारंगत असलेल्यास आचार्य ही संज्ञा आहे.

**आचिनोती च शास्त्रार्थात**
**आचरे स्थापयत्यपि ।**
**स्वयं आचरते यस्यात्**
**तस्मादाचार्य उच्चते ॥**

जो शास्त्रांचे अर्थ शिकवतो, स्वत: आचरणांत आणतो आणि विद्यार्थ्यांकडून आणवितो त्यास आचार्य म्हटले जाते.

द्रोण, भीष्म आणि चरक यांच्या नांवापुढे आचार्य ही उपाधि जोडली जाते, जसे भीष्माचार्य, द्रोणाचार्य, इ. परंतु जेव्हा 'आचार्य' असा उल्लेख येतो त्यावेळी तो फक्त आद्य शंकराचार्य यांना उद्देशून असतो.

आपल्या परंपरेप्रमाणे 'भारत' हे ५६ राज्यांत विभागले होते. (भागवत पुराणामध्ये सप्तद्वीपांचा उल्लेख असून या प्रत्येक राज्यात वेदाध्यायन - वेदपठण आणि अध्यापन

प्रचलित होते. मेसापोटेमिया आणि स्कँडिनेव्हियाचे वाङ्‌मयात मित्र (सूर्य) व वरुण यांचा उल्लेख आहे.) आचार्यांनी या सर्व ठिकाणी पदयात्रा केली आणि वेदातील अंतिम सत्य - अद्वैत तत्वाचा - प्रसार केला.

आचार्यांचे पूर्वीचे कालांत जवळ जवळ ७२ मतप्रणाली होत्या. या भिन्न मतप्रणालीमुळे वाद निर्माण होत. अशा या चमत्कारिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आणि कालात धार्मिक शिवभक्त शिवगुरु व त्यांची धार्मिक आणि भाविक पत्नी आर्यंबा या दांपत्यास पुत्रप्राप्ती झाली. त्याचे नांव त्यांनी शंकर ठेवले. (साक्षात् शिवाचा कृपाप्रसाद म्हणून.)

शिवगुरु आणि आर्यंबा या दांपत्यास मूल व्हावे अशी उत्कट इच्छा होती. आचार्यांचा जन्म होण्यापूर्वी घटना घडली ती अशी -

दोघाही पती पत्नीस एकाच आशयाचे स्वप्न पडले. त्यांना दृष्टांत झाला व साक्षात शिवाने त्यांना विचारले की, दीर्घायुषी परंतु मंदबुध्दी पुत्र हवा की, अल्पायुषी परंतु अतिशय बुध्दिमान पुत्र हवा ? या प्रश्नाने दोघेही गोंधळून गेले. कोणता निर्णय घ्यावा ते त्यांना कळेना, तो निर्णय त्यांनी ईश्वरावर म्हणजेच शिवावर सोपविला व ईश्वरी इच्छेने शंकरांचा जन्म झाला. त्याचे आयुष्य फक्त आठ वर्षे होते. शंकर आठ वर्षाचा असतांना अशी घटना घडली.

एके दिवशी स्नानासाठी घराजवळील नदीवर गेला असतांना मगरीने त्याचा पाय धरला. वडील वारले होते. संन्यास घेण्यासाठी शंकराने विधवा मातोश्रींची परवानगी मागितली जर परवानगी न द्यावी तर मगरीने पाय धरल्यामुळे मृत्यू निश्चित होता.

दृष्टांत झाल्याप्रमाणे पहिली घटना पुत्र होण्यासंबंधी होती आणि आता ही दुसरी घटना मुलाचे मृत्यूसंबंधी होती. या प्रसंगाने बिचारी माऊली गोंधळून गेली. आणि म्हणून योग्य तो निर्णय घेण्याविषयी आपले पुत्रासच सांगितले. अशा रीतीने आर्यंबाचा मुलगा आचार्य शंकर (शंकराचार्य) झाला.

विधिवत् संन्यास घेतल्यानंतर त्या व्यक्तीस संन्यास घेण्यापूर्वीच्या आयुष्या इतका कालावधी पुनर्जन्म म्हणून मिळतो आणि म्हणूनच संन्यास स्वीकारल्यामुळे आचार्यांचा (बाल शंकराचा) पुनर्जन्म होऊन त्यांचे आयुष्य आठ वर्षांनी वाढले. या पुनर्जन्माचे कालात श्री गुरुंचे शोधात भ्रमण करीत असतांना नर्मदा नदीचे तीरावर त्यांची श्री गोविंद भगवत्पादांची भेट झाली व ते छोट्या शंकराचे गुरु झाले.

गुरुंचे जवळ शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांची संमती घेऊन श्री शंकर काशीस गेले. तेथे विविध भाष्ये, प्रकरण ग्रंथ त्यांनी लिहिले. भक्तीपर देवतांची स्तोत्रे रचली. भारताच्या विविध भागांतून काशीस आलेल्या विद्वान पंडितांनी शंकरभाष्यांचा अभ्यास केला व आपल्या भागात परत गेल्यानंतर त्यांचा प्रसार केला.

शंकराचार्यांनी लिहिलेल्या ब्रह्मसूत्रावरील टीकेस मान्यता देण्यासाठी मूळ ब्रह्मसूत्र ज्यांनी लिहिले ते स्वयं व्यासमुनी वृध्द ब्राह्मणाचे रुपाने प्रगट झाले व त्यांनी आचार्यांना चर्चा करण्यासाठी पाचारण केले. ही त्यांची चर्चा, वादविवाद बरेच दिवस अव्याहत चालले. कोणाचीही हार होण्याची चिन्हे दिसेनात याचा अचंबा वाटून शंकराचार्यांचे शिष्याने दिव्य दृष्टीने ओळखले हे वृध्द ब्राह्मण स्वयं व्यासच आहेत.

**शंकरः शंकरसाक्षात् व्यासे नारायणो हरिः ।**
**तयो विवादे संप्राप्ते किंकरः किं करोम्यहम् ।।**

शंकराचार्य हे साक्षात् शंकर (शिव) आहेत व व्यासमहर्षी हे हरि म्हणजे नारायणच आहेत. हे दोघे संवादात गढले असतांना मी सेवक (किंकर) काय करु शकणार ?

## अद्वैत मताची पुनर्संस्थापना

श्री शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्रावरील लिहिलेल्या टीकेवर श्री व्यास महर्षी एवढे प्रभावित झाले की, शंकराचार्यांची शिकवण हे वेदांत तत्वच होय हे त्यांनी मान्य केले. व्यास महर्षींनी आचार्यांना त्यांचे आयुष्य आणखी सोळा वर्षांनी वाढवून दिले. व्यासमहर्षींची इच्छा होती की शंकराचार्यांनी अखिल भारतभर भ्रमण करुन अद्वैत तत्त्वांचा प्रसार करावा. व्यास महर्षींचे चरणी आपली भाष्ये अर्पण केल्यानंतर आचार्य आपले जीवन कार्य पूर्ण झाले असे आचार्य म्हणाले. परंतु काशीत आलेल्या विद्वान पंडितांनी आपल्या भागात परत गेल्यानंतर जरी भाष्यांचा प्रसार केला असला तरी भारताच्या त्या त्या भागात जाऊन आचार्यांनी लोकांना दर्शन द्यावे असे व्यास महर्षींनी त्यांना आदेश दिला. अशा प्रकारे श्री शंकर भगवत्पादांनी देशभर विविध भागांत भ्रमण केले व पवित्र ठिकाणी विविध मंदिरांत श्रीचक्राची स्थापना केली. ब्रह्मविद्येचे स्वरुप म्हणजेच श्री उमादेवीची स्थापना केली. स्थापना करुन उपासना सुरु केली. (केनोपनिषदात असा उल्लेख आहे की, उमादेवी साक्षात् ब्रह्मविद्येचे स्वरुप आहे.)

आचार्यांचा अवतार झाल्यानंतर लोकांच्या मनांवर असलेली वेगवेगळ्या तत्वप्रणालींची पकड नष्ट होऊन उपनिषदप्रणीत 'अद्वैत' तत्वांस जगन्मान्यता मिळाली. आपल्या देशात इतरही वेदांत पीठांचा उदय झाला परंतु त्या सर्वांचे मूळ अद्वैत तत्वज्ञानात आढळले. उपनिषदांतून आणलेले आणि आचार्यांनी प्रसार केलेले 'अद्वैत तत्व' इतके

सर्वंकष होते की विचारवंतांनी आपल्या मतप्रणालींचा त्याग करुन स्वेच्छा अद्वैत तत्वाचा स्वीकार केला.

परदेशातील थोर तत्वज्ञानीसुध्दा अद्वैत तत्वज्ञानानी एवढे आकर्षित आणि प्रभावीत झाले की त्यांनीही त्याचा निमूटपणे स्वीकार केला. आचार्यांचे नंतर त्यांचे उत्तराधिकारी व शिष्यांचे कालावधीत अद्वैत तत्वज्ञानावर अन्यमतप्रणालींचे विविध तत्वज्ञानी लोकांनी टीका केल्यानंतर अद्वैत तत्वज्ञानास अधिकच उजाळा मिळाला. स्वामी विवेकानंदांचा दृढ विश्वास होता की हे शास्त्रीय ज्ञान आहे आणि म्हणूनच त्याचा प्रसार त्यांनी इंग्लंड आणि युरोपात केला. अशाप्रकारे आचार्यांचे मत सर्वसंमत झाले, सर्वांना मान्य झाले. अर्थात् हे तत्वज्ञान किंवा सिध्दान्त काही नवा नव्हता. उपनिषदांतील हे सर्वश्रेष्ठ सत्य आहे आणि त्याचा प्रसार आचार्यांनी केला, पुनर्संस्थापना केली.

विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आचार्यांनी लहान वयात उपनिषदांतील 'अद्वैत तत्वाचा' प्रसार केला. श्री सायनाचार्यांशी तुलना करता, आचार्यांचे आयुष्य अल्पच होते. शंकराचार्यांचे मार्गाने जाणाऱ्या श्री सायनाचार्यांनी अखंड महत्त्वाची व चिरकाल टिकणारी वेदावरील भाष्ये लिहिली. आचार्यांनी भक्तीचे सहा मार्ग सांगितले आहेत व म्हणून त्यांना 'षण्मतस्थापनाचार्य' अशी संज्ञा आहे. आचार्यांचे नंतर झालेल्या शंकराचार्यांनी यापैकी कोणत्या ना कोणत्या भक्तिमार्गाचा प्रसार केला.

शिव, विष्णु, देवी आणि इतर देवता ही एकाच परमेश्वराची रुपे आहेत. आचार्यांचा अवतार झाल्यामुळेच या देवतांची उपासना टिकून राहिली आहे. कारण आचार्यांचा अवतार झाला नसता तर आमच्या हृदयात वसत असलेल्या परमेश्वराचे उच्चाटन झाले असते. आचार्यांचा अवतार झाल्यामुळेच आज आपण रामनवमी, जन्माष्टमी, शिवरात्री, दुर्गापूजा आणि इतर धार्मिक उत्सव करु शकतो. आचार्यांच्या कधीही न फिटणाऱ्या ऋणाची स्मृती म्हणून आणि आचार्यांचे ठिकाणी असणारा आदर, त्यांनी केलेल्या श्रेष्ठ कार्याची जाणीव आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आपण शंकराचार्य जयंती साजरी करीत आहोत.

## भगवत्पादांचे महान कार्य

वंशपरंपरागत (पिढ्यान् पिढ्या) ज्या देवतांची पूजा आपण भक्तिभावाने करतो ती एकाच सर्वश्रेष्ठ परमात्म्याची रुपे आहेत ही आचार्यांची शिकवण आहे. त्यांनी वेदांमध्ये पवित्र मानलेल्या शिव, विष्णु, अंबिका (देवी), सूर्य, विनायक व सुब्रमण्यम् या देवतांची स्थापना करुन भक्तिभावाने उपासना करण्यासाठी लोकांना प्रवृत्त केले. प्रत्येक देवतेचा विशिष्ट गायत्री मंत्र आहे. या देवतांची भक्तिभावाने उपासना केल्यास



वेदोक्त सत्पुरुष किंवा ब्रह्म म्हणजेच परमात्म्याची आपणास प्राप्ती होईल.

अशा रीतीने आचार्यांनी गीतेची शिकवण प्रत्यक्षात आणली.

**यो यो यां यां तनुभक्त:**
**श्रध्दयार्चितुमिच्छति ।**
**तस्य तस्याचलं श्रध्दा**
**तामेव विद्धाम्यहम् ॥**

आणि म्हणूनच आचार्यांना षण्मतस्थापनाचार्य असेही म्हटले जाते. भारतभूमीतील ५६ राज्यांमध्ये जेथे वेद प्रयलील होते तेथे आचार्यांनी भ्रमण केले. परमेश्वर एकच आहे, तो आपल्यामध्ये वास करतो, त्याचप्रमाणे ज्या ज्या गोष्टी दिसतात किंवा ज्यांचे अस्तित्व आपणास जाणवते त्या सर्वांमध्ये तो आहे. तो सर्वव्यापी आहे. (द्रष्टा, दृष्य आणि दृष्टी ही परमेश्वराचीच रुपे आहेत) ही शिकवण त्यांनी दिली. आणि अशा तऱ्हेने परमेश्वर एकच आहे या अद्वैत तत्वाचा आचार्यांनी प्रसार केला.

अंधारात एखादी दोरी सापच आहे असे भासले, परंतु त्यावर प्रकाश टाकला असता दोरीचे खरे स्वरूप दृष्टीस पडते व भ्रमनिरास होतो. दृष्टीभ्रम होण्यासाठीसुद्धा प्रत्यक्षात काही आधार असावा लागतो. वरील उदाहरणामध्ये दोरी हा प्रत्यक्षातील आधार आहे. एखादा माणूस जेव्हा स्वप्नातून जागा होतो तेव्हा स्वप्नात पाहिलेली आणि अनुभवलेली गोष्ट नाहीशी होते आणि स्वप्न पडले ती व्यक्ती शिल्ली राहाते. याचा अर्थ स्वप्नातील प्रत्येक गोष्ट आपण निर्माण करीत

असतो पण पहाटे जेव्हा आपण स्वप्नसृष्टीतून जागे होतो त्यावेळी स्वप्न संपले असते आणि आपण स्वतः शिल्लक राहतो. आपल्याशिवाय काहीही नसते त्या सत्याची जाणीव होते. याचप्रमाणे आरशातील प्रतिबिंब हे खरे नसून, प्रत्यक्षात आरशासमोर जे असते त्याचीच प्रतिमा आरशात दिसते. परमेश्वरच अंतिम सत्य आहे व बाकी सर्व माया आहे याची जेव्हा आपणास जाणीव होईल, मनोमन पटेल तेव्हा राग, लोभ, वासना, द्वेष आणि इतर भावनांचा आपणांवर दुष्परिणाम होणार नाही. सर्वत्र आपणास चिर शांतीचा अनुभव प्रत्ययास येईल.

श्री दक्षिणमूर्ती अष्टकातील पहिल्या श्लोकात शंकर भगवत्पादांनी ही कल्पना स्पष्ट केली आहे.

**विश्वंदर्पणदृष्यमाननगरीतुल्यं निजान्तर्गतं**
**पश्यन्नात्मनि मायया बहिरिवाद्भूतं यथा निद्रयां।**
**यः साक्षात्कुरुते प्रबोधसमये स्वात्मानमेवाद्वयं**
**तस्मै श्रीगुरुमूर्तये मन इदं श्रीदक्षिणामूर्तये॥**

निद्रेच्या वेळी स्वप्नांत भासणाऱ्या पदार्थाप्रमाणे हे सर्व विश्व आत्मस्वरुपाच्या ठिकाणी, आरशात दिसणाऱ्या एखाद्या नगरीच्या प्रतिबिंबाप्रमाणे दिसते. मायेमुळे जणू काही आत्मस्वरुपाच्या बाहेर ते उत्पन्न झाल्यासारखे प्रत्ययास येते आणि आत्मसाक्षात्काररुपी जागृतीच्या क्षणी नष्ट होते. त्यावेळी एकमेव अद्वितीय अशा आत्मस्वरुपी परमात्मा स्वरुपी श्री गुरु दक्षिणामूर्तीस मी हा नमस्कार करीत आहे.

या अष्टकातील शेवटचा श्लोक असा आहे –

**भूरंभास्यनलो ऽ निलोम्बरमहर्नाथो हिमांशुः पुमान्**
**इत्याभाति चराचरात्मकमिदं यस्यैव मूर्त्यष्टकम्**
**नान्यात्किंचन विद्यते विमृशतां यस्मात्परस्माद्विभो**
**तस्मै श्रीगुरुमूर्तये मन इदं श्रीदक्षिणामूर्तये॥**

पृथ्वी, जल, तेज, वायू आणि आकाश तसेच सूर्य चंद्र आणि विद्येचा अधिकारी असलेला जीव किंवा अंतर्यामी आत्मा (पुमान्) अशा रीतीने हे सर्व चराचर जग ज्याची मूर्तिमंत आठ रुपे आहेत ती सर्वांच्या प्रचितीला येतात. तत्वतः विचार करू गेल्यास विचारवंतांना सर्वश्रेष्ठ, विश्वव्यापी परमात्मा तत्वाशिवाय काहीच दिसून येत नाही. त्या परब्रह्म, परमात्मास्वरुप असलेल्या श्रीगुरु दक्षिणामूर्ती भगवान शंकरांना माझा हा नमस्कार असो!

अशा रीतीने अंतिम सत्य म्हणजे परमेश्वर होय याची आपणास जाणीव होते व दुसरा कोणताही विचार मनात येत नाही. परंतु याचा अर्थ निष्क्रियता असा नव्हे! उलट प्रत्येकाने आपले विहित कर्म (कर्तव्य) करावयासच हवे. परंतु हे कर्तव्य करीत असताना परमेश्वर एक आहे आणि अद्वैत तत्वाची जाणीव ठेवली तर कोठेही आसक्ती राहणार नाही. या महान सत्याची शिकवण देण्यासाठी आचार्यांनी अवतार घेतला आणि अखिल मानवांचे कल्याणासाठी कार्य केले.

अशा या धार्मिक आणि आध्यात्मिक तत्वज्ञानी, ज्याने वैदिक परंपरेतील विचार पुनर्प्रस्थापित केले आणि तेही आयुष्यातील अतिशय अल्प कालावधीत, त्या महान पुरुषांस आपण मनोभावे वंदन करुया! त्यांचे पूजन करुया. त्यांचे कृपेने आपणास परमात्म्याचे प्राप्तीसाठी मार्गदर्शन होईल.

शंकर भगवत्पादांनी परमेश्वराच्या निरनिराळ्या रुपांवर भक्तिपर काव्यरचना केल्या. मंदिरातून मोठ्या भक्तिभावाने त्या गायल्या जाऊन मंदिरातील देवतांच्या उपासनेस चैतन्य प्राप्त झाले. निरनिराळ्या मंदिरातील धार्मिक उत्सव संपन्न होऊ लागले. भगवत्पादांचा अवतार झाला नसता तर सर्वत्र नास्तिकांचे प्रभावामुळे आणि प्रसारामुळे घरोघरी जन्माष्टमी, विनायक चतुर्थी, श्रीराम नवमी आणि शिवरात्रीसारखे धार्मिक उत्सव साजरे झाले नसते. आपल्या पूर्वजांनी भगवत्पादांचे शिकवणीस घट्ट राहून धार्मिक प्रथा चालू ठेवल्या. आजही आपण धार्मिक कार्यक्रम व प्रथा पाळते याचे कारण त्यांची दृढ श्रद्धा हेच होय.

श्रीमद् आद्य शंकराचार्यांचा उपदेश अखिल जगातील मानवांचे कल्याणासाठी आहे आणि म्हणूनच त्यांना 'जगद्गुरु' म्हणतात. त्यांचे आपण अनुयायी आहोत याचा आपणास सार्थ अभिमान आहे व म्हणूनच आपण त्यांचे पूजन करतो. परंतु आमच्यामध्ये एक वैगुण्य आहे, दोष आहे तो म्हणजे आपण आचार्यांची शिकवण प्रत्यक्षात आणत नाही. प्रत्येकाने भगवत्पादांचे उपदेशाप्रमाणे नित्य अनुष्ठान व वंशपरंपरागत चालत आलेली ईश्वराची पूजा करावी. श्रीगुरुंनी त्यास दिलेल्या मंत्राप्रमाणे ध्यानधारणा करावी. परंतु सध्या, दुर्दैवाने आपणावर संकट कोसळल्यानंतर किंवा बिकट समस्या निर्माण झाल्यानंतरच परमेश्वराची आपणास आठवण येते; आणि मग ही पूजा, ती पूजा, नवस किंवा व्रते आपण करतो. नित्य अनुष्ठानाचे आधार आपण आपली आध्यात्मिक प्रगती केली नाही तर असल्या विशेष पूजा आणि धार्मिक कृत्यांस काय अर्थ आहे? अनुष्ठानाचे आधारेच आपणास ईश्वराची कृपा प्राप्त होईल. ईश्वरी कृपेशिवाय एखादा अणूही हालत नाही. (झाडाचे पानही हालत नाही.)

शंकराचार्य जयंतीचे दिवशी भगवत्पादांची शिकवण प्रत्यक्षात आणण्याचा आपण संकल्प करुया.

OOO

# माझे कुळ दैवत शिरडीचे साईबाबा

– दीपक रामचंद्र उदावंत
नागपूर.

मी माझ्या मित्रासोबत नागपूरच्या 'छोटा ताजबाग' येथे न चुकता सायंकाळच्या सात वाजताच्या आरतीस हजर राहत असे. हा उपक्रम अंदाजे दोन वर्षेपर्यंत चालू होता. या दोन वर्षांच्या कालखंडात माझे बरेच ताजुद्दीन श्रद्धेय मित्रांच्या भेटीचे योग आलेत. मनोकामना पूर्तीच्या कित्येक घटना त्यांच्या तोंडून मी ऐकत असे. तेव्हा माझ्याही डोळ्यात पाणी यायचे. तेव्हा मनातल्या मनात,स्वतःशीच मी बोलायचो 'ताजुद्दीन बाबा सर्वांच्या मनोकामना पूर्ण करतात' परंतु माझ्या मनोकामना पूर्तीसाठी बाबा काही दृष्टांत देत नाहीत आणि मनोकामना पूर्तीचा योगही आणीत नाहीत. तरी भक्तिमार्ग हा श्रेष्ठ मार्ग आहे. आज ना उद्या हा योग आपल्या जीवनात येईल हे विधान मनातल्या मनात करून मी माझा ताजुद्दीन दर्शनाचा उपक्रम चालूच ठेवला.

एक दिवस माझे चुलत काका श्री. अर्जुनपंत नारायण उदावंत हे माझ्या घरी आले. ते साईभक्त होते. त्यांच्या शिर्डीच्या कित्येक वाऱ्या झाल्या होत्या. त्यांनी मला ''साईसच्चरित्र ग्रंथाच्या साखळी पारायणाच्या'' कार्यक्रमासाठी श्री. वि. बा. सिंगम ह्यांच्याकडे बोलाविले व साई सच्चरित्र ग्रंथाचा केवळ एक अध्याय वाचण्यास सांगितले. तेव्हा मी ताजुद्दीन निष्ठ भक्त होतो. प्रथम खूप आढेवेढे घेतले. तेव्हा काका म्हणाले फक्त एकच अध्याय वाचण्यास तुला सांगत आहे. नंतर पुन्हा वाच असे तुला मी सांगणार नाही. तेव्हा काका म्हणतात म्हणून वाचायचे म्हणून मी त्यालला एक 'अध्याय' वाचू लागलो. तो अध्याय भिंतीवर सरपटणाऱ्या पालीचा होता. तिची औरंगाबादहून बहीण भेटण्यासाठी शिर्डीस येत आहे, असे साईबाबा पालीची भाषा ओळखून भक्तांना सांगत होते. म्हणजे साईबाबांना किडामुंगी पाल ह्यांची भाषा अवगत होती हे वाचल्यामुळे मी दुसरा अध्याय वाचावयास घेणार एवढ्यात काकांनी मला थांबविले, म्हणाले ''साखळी पारायणाचा अर्थ'' एका साईभक्ताने केवळ एकच अध्याय वाचवयास पाहिजे. तेव्हा त्याला आपण साखळी पारायण म्हणू. ह्यात दाभोळकरांनी 'त्रेपन्न' अध्याय लिहिल्यामुळे त्रेपन्न साईभक्त साखळी पारायणाच्या संदर्भात हवे असतात.

तेव्हा माझ्या 'अंतर्मनात'

''लाख सोडा ही चतुराई

स्मरा निरंतर साई साई''

ही प्रचिती आली. काय झाले कुणास ठाऊक जिथे जिथे ''साईसच्चरित्र ग्रंथाचे साखळी पारायण'' होऊ लागले त्या त्या ठिकाणी न बोलाविता 'साईग्रंथ' वाचावयास मी जाऊ लागलो... तसे साईबाबांचे स्वप्न दृष्टान्तही मज नित्य घडू लागले. माझ्या आध्यात्मिकतेला नव चैतन्याची लकाकी साई दृष्टान्ताने प्राप्त होऊ लागली.

"If you Look To Me
I Look To You"

त्यावेळी प्रस्तुत विधानाची सत्यतेचा पडताळा आला. संत पृथ्वीवरचे चालते बोलते परमेश्वर ही प्रचिती आली.

त्यावेळच्या कालखंडात 'लोकमतला' ''ना हिन्दू ना मुसलमान शिर्डीचा संत महान'' हा लेख प्रकाशित झाला. त्या लेखात श्री. गोपाळराव बुटी नित्य नेमाने ताजुद्दीन बाबांच्या दर्शनास येत असत. तेव्हा एकदा ताजुद्दीन बाबा बुटींना म्हणाले ''तुम यहाँ क्यों आते हो ? शिर्डी का साई आपका बेताबी से इंतजार कर रहाँ है !'' प्रस्तुत लेखातल्या ह्या विधानामुळे मी सावध झालो. आपल्याही नशिबी 'साई' आहे म्हणूनच आपणही 'बुटी' प्रमाणे साई भक्तीकडे वळलो हे समाधान व आनंददायी विधान अंतरंगात कायमचे घर करून आहे. (संत कधीच व्याप करणारे नसतात.)

संताच्या ठाई भेदभाव मुळीच नसतो. त्यांना सर्व भक्त समान असतात. साईबाबांच्या भक्तीच्या मार्गात आलो तेव्हां पुन्हा एक सत्य उलगडले. मी पाच वर्षांचा असताना, आईसवे शिर्डीस गेलो होतो. आईने माझे साई समाधीवर डोके टेकविले. नंतर शिर्डीदर्शनाचा आजपावेतो तरी संधी आली नाही. तरीही साई श्रद्धेचा भुकेला असल्याने मी माझ्या ठाई पूर्णतः समाधानी आहे.

I get what I want ?

मला जे हवं होतं ते साई भक्तीत परिपूर्ण निस्वार्थ भावनेनं साईंच्या भक्ती रंगी रंगतांना लाभलंय.

खरं सांगू काय ? मला कुणी विचारतात तुमचं कुळदैवत कोण आहे ? आताशा... मी चटकन उत्तर देतो... ''शिर्डीचं सच्चिदानंद सदगुरु साईनाथ महाराज !''

सांगण्याचे तात्पर्य ताजुद्दीन बाबांच्या प्रेरणेमुळेच मी साई भक्तीकडे वळलो. संत हे आपआपले भक्त ओळखतात. एखादा भुला भटका दर्शनास आला की तेच त्याला योग्य दिशेला वळवितात हे सर्व 'आत्मसाक्षात्काराचे' धडे भक्तिमार्गामुळेच घडत असते. ह्या भक्तिमार्गातूनच आपल्यातच आपल्याला... झालेलं आपलंच दर्शन म्हणजे 'आत्मदर्शन' घडले. कारण साईची कृपा अष्टवक्री आहे. तेजोमय सूर्य किरणाप्रमाणे आहे. साई अंधःकाराचा नायनाट करून भक्तीचा तेजोमय पुंज आहे.

आजच्या वर्तमान परिस्थितीत परमेश्वराच्या भक्तीसाठी अनेक मार्ग (पर्याय) आपणां समोर आहेत. परंतु सर्व पर्याय (मार्ग) मध्ये भक्तिमार्ग हा श्रेष्ठ मार्ग आहे. प्रस्तुत मार्ग अवलंबितांना ''श्रद्धा आणि सबुरी'' ह्याची साधकाला नितांत आवश्यकता असते. जे सबुरीने घडते तेच टिकावू असते. ही सामाजिक बाब प्रत्येक साई श्रद्धेय मार्ग अवलंब करणाऱ्या भक्ताने अंतरंगात बिंबविली पाहिजे.

ooo

# भक्ती (भाग २ रा)

- वसंत दळवी

❖❖❖

**'भक्ती' या विषयावरील श्री. दळवी यांच्या लेखाचा पहिला भाग आपण गेल्या अंकात वाचला आहे. प्रस्तुत अंकात भाग २ रा प्रकाशित केलेला आहे. आणि पुढील अंकात तिसरा व अंतिम भाग प्रकाशित करण्यात येईल. आपली भक्ती अंधश्रद्ध ठरू नये, ती डोळस असावी यादृष्टीने भक्ती हे साद्यंत विवेचन अत्यंत महत्वपूर्ण आहे.**


❖❖❖

सततचा अभ्यास व परिश्रमाशिवाय 'कृपा' होत नाही हे खरे पण ती होण्यास परमेश्वराची इच्छाही हवी, त्याशिवाय ती मिळत नाही. दोन्ही गोष्टी परस्परावलंबी आहेत. त्यासाठी परमेश्वरावर अतुट विश्वास व श्रद्धा हवी त्याप्रमाणेच 'सबुरी'ची आवश्यकता आहे. श्री साईसच्चरितांत 'श्रद्धा व सबुरी'चा उपदेश वेळोवेळी पुनःपुनः केलेला आढळतो तो यासाठीच. हीच गोष्ट स्पष्ट करताना आनंद ऋषी म्हणतात, 'आंतरिक जगतात कोणतीही गोष्ट 'करता' येत नाही, तर ती घडते.' प्रेम, प्रार्थना, ध्यान, करुणा ह्या गोष्टी करता येत नाहीत, तर त्या घडतात. भक्तिमार्गात ह्यासाठीच 'कृपा' हा शब्द वापरतात. काही गोष्टी प्रयत्नाने घडत नाहीत, तर त्यासाठी कृपा व्हावी लागते. अर्थात जो भक्त जाणीवपूर्वक, श्रद्धापूर्वक, प्रेमाने व सातत्याने भक्ती करत असतो केवळ त्याच्या बाबतीतच कृपा घडू शकते. परमेश्वराचे दिव्य दर्शन व आत्मसाक्षात्कार त्याच्या इच्छेने व करुणेनेच होऊ शकतें... परंतु हेही खरे की भगवंताचा अनुग्रह सर्वांवर सारखा होत नाही. पाप-पुण्य, पात्रापात्र, योग्यायोग्य च्या विचाराने व अधिकारानुसार होतो. ह्या अधिकार येण्यासाठी साधना निष्ठापूर्वक, निरंतर, आदरपूर्वक व परमेश्वरावरील प्रेमाने व अनन्यशरणागत भावाने करणे अवश्य आहे. अध्यात्मात 'पी हळद हो गोरी' असा प्रकार नसतो. पू. गुरुदेव रानडे म्हणतात, ''साक्षात्काराला अंतःकरणाचे मार्दव व देवाबद्दल कळवळा असावा लागतो. तो असल्यावर देव दूर नाही. अंतःकरण पाझरल्यावर देव मिळतो, पण तो मिळत नाही हे खरेच म्हणून भक्तिमार्ग एका दृष्टीने सोपा व दुसऱ्या दृष्टीने अवघड आहे.'' हे शब्द खूप बोलके आहेत. तर पू. विनोबाजी श्रद्धा व सोप्या भक्तीचा अर्थ विशद करताना म्हणतात, ''ज्ञानयोग, कर्मयोग, ध्यानयोग व भक्तियोग ह्यात भक्ती सोपी म्हणून सांगितली आहे, परंतु लक्षात ठेवा की ती सहज साध्य नाही. भारतात भक्तीचा प्रभाव फार आहे असे म्हटले जाते पण ती भक्ती नसून श्रद्धा आहे. भक्ती व श्रद्धा ह्यात फरक आहे. मंदिरात असलेल्या मूर्तीविषयी असलेली आस्था असते ती श्रद्धा आहे. श्रद्धेची भक्तीच्या मार्गावर जरुर आहे. श्रद्धा असणे फार मोठी वस्तू आहे, पण तिचा अभाव फार मोठी गोष्ट आहे. कारण श्रद्धा नसेल तर भक्ती उद्‌भवणार नाही. भक्ती म्हणजे अहंकार व ममता ह्यापासून मुक्ती. निरहंकारीता व नम्रता ह्यामुळे भक्तीचे मूल्य वाढते.' ईश्वराची प्रेमभावाने आराधना, भजन, सेवादी केल्याने भक्ताच्या हृदयात परमेश्वराप्रती अहेतुक, निर्विघ्न, निश्चल, अढळ अशा भक्तीचा उद्‌भव होतो. हीच परमभक्ती होय, माणसाचा परमधर्म होय. त्यायोगे त्याचे ठायी वैराग्य उत्पन्न होऊन त्याला आत्मज्ञान होते.

परमेश्वर प्राप्तीचे अनेक मार्ग सांगितले आहेत. पूर्वजन्मीचे संस्कार, योग्यायोग्यता, स्वाभाविक वृत्ती व कलानुसार साधक आपला मार्ग निवडतो. कर्माकर्मविचार, वर्णाश्रम धर्म, योग, ध्यान, नामस्मरण, भजन, भक्ती इत्यादी अनेक साधनांचा विचार अध्यात्मशास्त्रात केला गेला आहे. अध्यात्म मार्ग ह्या शब्दात ज्ञान, भक्ती, कर्म, योग, तंत्रादी सर्व मार्गांचा समावेश होतो. मार्ग अनेक असले तरी ते एकाच परमेश्वराकडे नेणारे आहेत. सद्‌गुरू अधिकार भेदानुसार साधकाला योग्य मार्ग दाखवितात. शास्त्रात सांगितलेली वर्णाश्रमाची योजना भिन्नभिन्न प्रकृतीच्या व्यक्तींचा स्वभाव व वृत्तींना अनुसरुनच केली आहे.

. ज्याला विषयाची, कामाची-स्त्रीविषयक आसक्ती आहे, त्यांनी विद्याजर्जनांतर गृहस्थाश्रम स्वीकारावा म्हणून सांगितले आहे. गृहस्थाश्रमी लोकांची ओढ विषयांकडे अधिक

असते. ही ओढ कमी झाल्याशिवाय ईश्वराविषयी प्रेम वाटत नाही. ओढ निर्माण होत नाही. काही लोक विचाराने विवेकी व वैराग्य संपन्न असतात त्यांनी वानप्रस्थाश्रम स्वीकारावा, तर काही नेमक्या, मोजक्या व्यक्तींच्या ठायी जन्मजात कडकडीत व धगधगीत वैराग्य असते, त्यांनी संन्यासाश्रम स्वीकारावा. शास्त्रात धर्माचरणाचे चार पुरुषार्थ सांगितले असले तरी मोक्ष अंतिम साध्य आहे, असे म्हटले आहे. धर्म, अर्थ, काम इत्यादींचे उपभोग शास्त्रानुसार घेतल्यानंतर मनाला स्थिरता येते, विवेक वृत्ती जागृत होते, ह्याबरोबर देहस्थिती उत्तम राखल्याने व्यक्तीची शारीरिक व मानसिक स्थिती मोक्षासाठी अनुकूल होत जाते, म्हणून हे तीन पुरुषार्थ साध्य नसून त्याकडे साधन म्हणून पाहायला हवे.



परंतु भगवंत म्हणतात, हे वर्णाश्रमाचे नियम माझ्या अनन्य भक्तास लागू नाहीत. ''का मत्पर जो भक्त। त्यासी आश्रम नेम नाही तेथ। तो माझेनि भजने कृतकृत्य। जाण निश्चित उद्धवा॥ ऐसे जे माझे भक्तोत्तम। त्या न लगे आश्रम नेम। त्यांचा सर्वही स्वधर्म॥ (भागवतः ३७५-३८१) कारण कर्मनदीतील भोंवऱ्यात जे सापडले ते सर्व कलाशेत गुंतून बुडाले. भक्तीने मात्र कर्मनद्दी कोरडी पडते. सर्व कर्मे ईश्वरार्पण बुद्धीने व सेवाभावे केल्यानेच नैष्कर्म सिद्ध होते. म्हणून ह्या काळात 'भक्तीयोग'च श्रेष्ठ आहे. तो सर्वोधारक तसाच समन्वयी आहे. कर्माचा व ज्ञानाचा समन्वय साधणारी भक्ती सर्वांचाच उद्धार करणारी आहे. तेथे भेद नाही. थोडक्यात असे म्हणता येईल की परमार्थ साधनाचा पाया कर्मयोग आहे तर ज्ञानयोग त्याचा कळस आहे व भक्तियोग त्याचा गाभा आहे.

श्रीरामकृष्ण परमहंस म्हणत की भक्तिद्वारे सारं काही मिळू शकतं. ते म्हणतात, ''कलीयुगी भक्तियोग श्रेष्ठ होय. नारदीय भक्तीच तारक आहे. ईश्वराचे नामसंकीर्तन करणे आणि व्याकुळ होऊन प्रार्थना करणे की, 'हे ईश्वरा, मला ज्ञान दे, भक्ती दे, मला दर्शन दे, माझं कर्म कमी करुन दे. जेवढं कर्म तू ठेवलंस तेवढं जेणेकरून, तुझ्या कृपेने अनासक्त होऊन करु शकेन असं कर आणि जेणेकरून जास्त कर्मात गुंतण्याची इच्छा न होवो.'' पुढे म्हणतात, कुणाविषयी, कुणा पंथाविषयी विद्वेष बाळगू नये. निराकारवादी, साकारवादी त्याच्याकडेच जात आहेत. ज्ञानमार्गी लोक त्याला ब्रह्म म्हणतात, योगी परमात्मा म्हणतात तर भक्त त्याला भगवान म्हणतात.'' भक्तीचे स्वरुप व्यक्त करणारा हा उपदेश निःसंशय मननीय आहे. तशीच श्रीसाईसच्चरिता'त अध्याय एकवीसमधील सौदागराची कथा चिंतनीय व भक्तीचा महिमा वर्णन करणारी आहे. नेमक्या ओव्यांत भक्तियोगाचे रहस्य सांगितले आहे. ''कृपा ईश्वरी तें हे घोडे। हे तों नवविधा भक्तीचे कोडे। विनाभक्ति न परमेश्वर जोडे। ज्ञाना न आतुडे एक ह्या॥९४॥ श्रवण-कीर्तन-विष्णुस्मरण। चरणसेवन-अर्चन-वंदन। दास्य-सख्य-आत्मनिवेदन। भक्ति हे जाण नवविधा॥९५॥ पूर्ण भान ठेवूनि अंतरी। यांतून एकही घडली जरी। भावाचा भुकेला श्रीहरी। प्रकटेल घरींच भक्ताच्या॥९६॥ जपतपव्रत योगसाधन। वेदोपनिषद-परिशीलन। उदंड अध्यात्मज्ञान-निरुपण। भक्तिविहीन ते फोल॥९७॥ नको वेद शास्त्र व्युत्पत्ती। नको ज्ञानी हे दिगंतकीर्ति। नको शुष्क भजन प्रीती। प्रेमळ भक्ति प्रहिजे॥९८॥ भक्तीचे हे 'सार' आकलन झाले की भक्ती उमजली असे म्हणावयास हरकत नाही. तरी शास्त्रात व संतांनी सांगितलेली भक्तीची लक्षणे कळली तर साधकाच्या भक्तीचा पाया अधिक दृढ होण्यास मदत होईल.

**भक्तीची लक्षणे, प्रकार व स्वरुप :-** भक्ती सकाम व निष्काम अशी दोन प्रकारची सांगितली आहे. सकाम भक्ती तामस, राजस व सात्त्विक अशी त्रिगुणात्मक असते. हिंसेसाठी तसेच मत्सर, द्वेष व क्रोधापोटी, दुसऱ्याचे अहित चिंतून केलेली भक्ती तामस भक्ती होय. राजस भक्त यश, धनसंपत्ती, भोग मिळावेत ह्या इच्छेने भक्ती करतो. सात्त्विक वृत्तीचा भक्त पापक्षालनार्थ भक्ती करतो. यज्ञयागादी, इतर विहित कर्मे ईश्वरार्पण बुद्धीने करत असतो.

उपासना व कैंकर्य अशी भक्तीची दोन रुपे सांगितली आहेत. उपासनेमधेसदैव परमेश्वराचे ध्यान करणे, सतत

स्मरण-चिंतन करणे, त्याचेवरील अखंड विश्वासाने व श्रद्धेने पूजन-अर्चन करणे, ह्याचे नाव उपासना. तेलाच्या धारेप्रमाणे ध्यानात सातत्य येऊ लागले की परमेश्वराशी एकरुपता साधू लागते. प्रथम स्तवन, नंतर प्रशंसा त्यानंतर अर्चनम् म्हणजे पूजा करायची मग सेवनम् म्हणजे त्याची सेवा करावयाची- 'स्तवनम्, प्रसन्नम्, अर्चनम्' असा उपासनेचा क्रम आहे. उपासनेने चंचल मन स्थिर होते. भगवंतानीच सांगितले आहे की मन चंचल जरुर आहे पण अभ्यासाने ते स्थिर होते. बाह्य विषयांपासून मनाला परमेश्वराकडे वळविण्यासाठी अभ्यास, ज्ञान व कर्मफलत्याग अशा पायरीपायरीने गेल्यास मन परमेश्वराकडे वळून स्थिर होऊ लागते. मग बाहेर धावणाऱ्या मनाला केवळ परमेश्वरावर प्रेम करण्याची संवय लागते. वैराग्य निर्माण होऊन संसारात विरक्ती व परमेश्वरावर अनुरक्ती उत्पन्न होते.

कैंकर्याच्या अंतर्गत संध्या, गायत्री, पूजा, जप, कीर्तन, ध्यान ही सर्व उपासना येते. कुटुंब वा राष्ट्रासाठी केलेला त्याग व सेवा हे कैंकर्य होय. परमेश्वराची सेवा करणे हा जीवाचा धर्म आहे, कारण तो शाश्वत भगवद्दास आहे. भक्ती मग ती माधुर्य भक्ती असो वा दास्य भक्ती असो भगवद् कैंकर्य असणे आवश्यक आहे. आपल्या अंतर्यामी वसत असलेला परमेश्वरच सर्व प्राण्यांच्या ठायी आहे, सर्वत्र त्याचा वास आहे, असे एकही स्थान नाही, जेथे परमेश्वराचा वास नाही, त्याचे रुप सूक्ष्म आहे, तसे सर्वव्यापक आहे. ह्या भावात कैंकर्य तीन प्रकारे होतो- १) कोठेही लपून छपून पाप न करणे. असे एकही स्थान नाही की जेथे परमेश्वराचे अस्तित्व नाही म्हणून चोरून पापकर्म करण्यासाठी कोणाला, कुठेही एकांत असे ठिकाण मिळणे शक्य नाही. २) परमेश्वर सर्व प्राणीमात्रात वास करतो तेव्हा कोणाचा द्वेष, मत्सर, तिरस्कार करणे, कोणाला दुःख, कष्ट देण्याच्या उद्देशाने बोलणे किंवा वागणे, त्याचे अहीत चिंतणे म्हणजे आपल्या अंर्हियामी वसत असलेल्या परमेश्वराचाच अवमान करण्यासारखे आहे, तेव्हा प्राणीमात्रांची सेवा ही आपल्यात वसत असलेल्या परमेश्वराची सेवा होय हे लक्षात ठेवावे. ३) आपला देह हा अंतर्यामी परमेश्वराचे मंदिर आहे म्हणून ते स्वच्छ, निर्मळ ठेवणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. हृदयात अपवित्र, घाणेरड्या वासनांना थारा देणे किंवा मनात शुद्र विचार ठेवणे म्हणजे अंतर्यामी वसत असलेल्या परमेश्वराची अवहेलना करण्यासारखे आहे.

शास्त्रात भक्तीचे दोन भेद सांगितले आहेतः गौणीभक्ती व पराभक्ती. आणि अपरा भक्तीविषयीही सांगितले आहे. ते असे गौणीभक्ती किंवा उपासना :- ही नवधा भक्तीचे बीज आहे. परमेश्वराचे माहात्म्य, त्याचे दयालुत्व, कारुण्य, वात्सल्य इत्यादी गुणांच्या स्मरणाने साधकाच्या हृदयात प्राथमिक भक्तीचा उदय होतो. भक्तीची सुरवात म्हणून ह्या भक्तीस गौणी भक्ती म्हटले आहे. दैवी मीमांसा दर्शनात म्हटले आहे, ''सा द्विधा गौणी पराच''. ह्यांनाच साधना दशागत व सिद्धी दशागत भक्ती म्हटले आहे. साधना दशागत भक्ती म्हणजे साधनेद्वारा प्राप्त अशी भक्ती ती गौणी भक्ती व सिद्धिदशागत भक्तीला 'परा' भक्ती म्हटले जाते. विषय भोगासाठी केलेली सकाम कर्मे करून सांसारिक उपभोग गौणी भक्तीने मिळतात तर पराभक्तीत सर्व कर्मे ईश्वरार्पण बुद्धीने व ईश्वराची समजून केल्याने परमेश्वराची प्राप्ती होते. गीतेत ह्यालाच कर्मयोग म्हणून संबोधिले आहे. तर श्रीमद् भागवतामधे 'गौणभक्ती' योग म्हटले आहे. ह्यात सर्व कर्मे समर्पित भावाने व ईश्वरी इच्छेनुसार केली जातात. त्यामुळे मुमुक्षूचे विषयासंबंधीचे आकर्षण कमी होत जाऊन तो वासनारहित होतो. पुढे क्रिया गौण होत जातात. ईश्वरावरील अनुराग वाढल्याने देहाचे विस्मरण होऊ लागते. गौणी भक्तीत अभिप्रेत असलेली उपासना व संकीर्तन, सामूहिक भजनादिकामुळे चित्तशुद्धी होते. हळू हळू मन स्थिर व शांत होते. मनाच्या वृत्ती अंतर्मुख होतात. मन एकांतात फक्त परमेश्वराचेच चिंतन करु लागते. रजोगुण व तमोगुण ह्या दोहोंचा प्रभाव कमी होऊन सत्त्वगुणाची वाढ होऊ लागते. त्याचा दृश्य परिणाम म्हणजे साधकाचा स्वभाव गंभीर होतो, मितभाषी होतो, अधिकाधिक अंतर्मुख बनून मौन धारण करु लागतो. मनाचे चंचलत्व कमी होते. अशा स्वच्छ व निर्मल झालेल्या हृदयात ईश्वरी प्रेमाचा उदय होतो. तो ईश्वराकडे ओढला जातो. श्रीरामकृष्ण परमहंस म्हणतात त्याप्रमाणे 'भक्त सुई बनतो व प्रभू लोहचुंबक,' प्रभू भक्ताला आपल्याकडे ओढून घेतात. अशारीतीने मन भगवदाकार झाल्याने भक्ताला एकमात्र ईश्वराव्यतिरिक्त काही दिसत नाही. मन जेथे जाईल तेथे त्याला मग ईश्वरच दिसतो.

गौणी भक्तीत आणखी दोन भेद सांगितले आहेत. 'वैधी' व 'रागात्मिका' भक्ती. विधींच्या द्वारा तिचे साधन होते म्हणून तिला वैधी भक्ती म्हटले आहे. साधक गुरुउपदेशानुसार नवविधा भक्तीत सांगितलेल्या साधनांचा विधिपूर्वक नियमित अभ्यास करून खऱ्या भक्तीचा अधिकारी होतो. वैधी भक्तीने भगवद्कृपा प्राप्त होते. साधकाचा प्रेमप्रभाव भगवंताकडे अविच्छन्नपणे वाहू लागतो. त्याने भगवंत प्रसन्न होऊन भक्ताचे हृदयांतरी वास करून त्याला अपूर्व अशा शांतीचा व आनंदाचा लाभ करुन देतात. ह्या भगवद् प्रेमाला 'रागात्मिका' भक्ती म्हटले आहे. त्यात भक्ताला लोकलज्जा, लोकभय उरत नाही. प्रपंचाच्या ठिकाणी वैराग्य प्राप्त होऊन भगवद्भावाची प्राप्ती होते.

**परा व अपरा भक्तीः**- परा भक्तीचा आरंभ ईश्वरी कथा **श्रवण** करून, नामस्मरण व नामसंकीर्तनातून होतो. ईश्वरी लीला श्रवण करुन व कीर्तनामुळे मन ईश्वराकडे आकृष्ट होते.



मनाची विषयासंबंधीची ओढ कमी होऊन, मनाला ईश्वराची गोडी लागते. परमेश्वरावरील प्रेमभावना वाढत जाऊन त्याची परीणती स्वतःला ईश्वरचरणी अर्पण करण्यात होते. भक्ताच्या हृदयात आता वैराग्याचा उदय झालेला असतो. वैराग्यामुळे प्रपंचात विरक्ती तर ईश्वरावर अनुरुक्ती उत्पन्न होते. तेव्हा परा भक्तीला प्रारंभ होतो. भक्ताच्या हृदयात आता वैराग्याचा उदय झालेला असतो. वैराग्यामुळे प्रपंचात विरक्ती तर ईश्वरावर अनुरुक्ती उत्पन्न होते. तेव्हा परा भक्तीला प्रारंभ होतो. भक्ताच्या ठायी अनन्यता येते. 'अनन्यता'चा अर्थ आहे, परमेश्वराव्यतिरिक्त दुसऱ्या कोणालाही हृदयात स्थान न देणे; मग तो मनुष्य असो की देवता असो अथवा कामिनी-कांचन असू देत, तेथे आता कोणाला स्थान नसते. परमेश्वरावरील अशा अविचल प्रेमाचे नाव आहे पराभक्ती. जेव्हां पराभक्तीचा उदय भक्ताच्या हृदयात होतो तेव्हा भक्त 'मला हे कर्म केले व हे न केले पाहिजे' ह्या विचाराचा तो त्याग करतो. पराभक्तीमधे भक्ताला परमेश्वराशिवाय काही दिसत नाही. त्याच्या दृष्टीने सर्व ईश्वरमय झालेले असते. अद्वैत अवस्था प्राप्त होण्याच्या मार्गावर तो दृढ होतो. कर्मे करून अकर्मी असणाऱ्या भक्तांच्या कर्मराशींचा नाश मग परमेश्वर स्वतः करतो. त्याच्या योगक्षेमाची जबाबदारी घेतो. 'समाधी व्युत्यानी हरि विलसे त्याविण अन्य काही न भासे। मौनही वाचे न पडे। कि हरिरुप, अखंड नयनापुढे ॥' ही पराभक्तीची अंतिम स्थिती, अपरा भक्तीमध्ये कर्म आवश्यक राहते व ती सर्वसाधारण जनांकरिता सांगितली आहे. ह्यांत विषय भोगासाठी केलेली सकाम कर्मे व ईश्वरप्राप्तीसाठी केलेली कर्मे अंतर्भुत आहेत. पहिल्याने प्रपंचातील सुखादी उपभोग मिळतात तर दुसऱ्याने ईश्वरी कृपेसाठी लागणाऱ्या चित्तशुद्ध होते. श्रीमद् भागवतात कथिलेल्या नवविधा भक्ती कर्मप्रधान अपरा भक्ती होत. ह्या भक्तीमुळे भक्ताचे हृदय शुद्ध व निर्मळ होत जाते. भगवद् प्रेमाचा उद्‌भव होऊन तद्रुपता येऊ लागते. भगवद् चिंतनात, त्याचे गुणगान गाण्यात, श्रवण कीर्तनादीत तो मग्न होतो. ह्या प्रारंभिक स्वरूपाच्या भक्ती-आचरणातून परमभक्तीची सुरवात होते. परमभक्ती ही थोडी सूक्ष्म व गहण आहे. गुरुकृपेने वा ईश्वर कृपा करील तेव्हाच अशा भक्तीचा लाभ होतो. तरी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ह्या दोन्ही भक्ती परस्पर विरुद्ध नसून एकमेकांना पूरक आहेत. पराभक्ती ही अपराभक्तीपेक्षा थोडी सूक्ष्म व गहन आहे. ज्ञानी भक्तच तिचा अधिकारी होऊ शकतो. म्हणून तिला ज्ञानप्रधान भक्ती म्हटले आहे. ज्ञानापूर्वी करण्याच्या भक्तीला म्हणून साधनारुपी भक्ती म्हणतात. उपासना साधना भक्तीच आहे.

'प्रबोध सुधाकर' मधे श्रीमद् शंकराचार्य भक्तीचे दोन भागात विभाजन करतातः- ''स्थूला, सुक्ष्मा चेतिद्वेधा हरिभक्तिरुद्दिष्ठा। प्रारम्भे स्थूला स्यात् सूक्ष्मा स्थातः सकाशाद्य ॥'' भक्ती स्थूल व सूक्ष्म अशा दोन प्रकारची सांगितली आहे. प्रथम स्थूल भक्ती व त्यामधून सूक्ष्मभक्तीचा उदय होतो. त्यांच्या मते खरा भक्त परमेश्वराच्या नियमांचे निर्विवाद पालन करतो. साधक आपले आचरण शास्त्रशुद्ध ठेवतो. त्यातून खऱ्या भक्तीचा उदय होतो. तरी तोही भगवद् कृपेनेच होतो. परमेश्वरच साधकाची हळू हळू प्रगती करून घेतो, पण त्यासाठी संपूर्ण शरणागती व समर्पण भाव अवश्य आहे. भक्तीचे अंतिम स्वरुप म्हणजे 'स एवाहम्' मी तोच आहे, हेच जीवाशीवाचे ऐक्य होय. कारण भक्त व परमेश्वर विभक्त असू शकत नाही व विभक्त भक्त असू शकत नाही.

श्रीमद् शंकराचार्यांनी मोक्षप्राप्तीकरता भक्ती श्रेष्ठ आहे असे म्हटले आहे- ''मोक्ष कारण सामग्र्यां भक्तिरेव गरीयसी।'' प्रापंचिकां-करिता भक्तीपर स्तोत्रेही लिहिली आहेत. त्यातील 'शिवानंद लहरी' व 'सौंदर्यलहरी' ही स्तोत्रे भावपूर्ण आहेत तर 'हरिमीडे' व 'दक्षिणामूर्ति ह्या स्तोत्रांचे लक्ष्य आहे सर्व विश्वव्यापी आत्मतत्त्व.

भक्तीचे आणखीही प्रकार सांगितले आहेत. एक आहे आरोपसिद्धा भक्ती. ह्यात 'भक्ति भाव' नसूनही विहित कर्मे,

कर्तव्ये परमेश्वराला अर्पण केल्याने भक्तिभाव जागृत होतो. दुसरी स्वरुपसिद्धा भक्ती. ही स्वयंसिद्ध भक्ती आहे. नवविधा भक्ती स्वरुपसिद्धा भक्ती होय.

आचार्य निम्बकाचार्यांनी भक्तीचे प्रमुख लक्षण 'प्रेम-विशेष' आहे, असे सांगून ती दोन प्रकारची असते असे म्हटले आहे. एक साधना भक्ती व दुसरी साध्यभक्ती. त्यांनी साधना भक्तीला अपरा भक्ती व साध्य भक्तीला पराभक्ती म्हटले आहे. ज्ञानापूर्वी केल्या जाणाऱ्या भक्तीस साधनारुप भक्ती व ज्ञानोत्तर करण्याच्या भक्तीला फलरुपी भक्ती म्हटले आहे. उपासना साधनारुप भक्तीत येते.

ह्याशिवाय 'शुद्धा भक्ती' व 'कर्ममिश्र भक्ती' असे दोन प्रकार आहेत. ईश्वराचे गुण गाणे, त्याचे चिंतन, नामस्मरण करणें ही शुद्धा भक्ती होय. तर कर्ममिश्र भक्तीत सर्व कर्मे परमेश्वराची इच्छा व आज्ञा समजून करणे ही कर्ममिश्र भक्ती होय. भक्ती ही व्यभिचारी व अव्यभिचारी अशा दोन स्वरुपाची असते. विश्वात व परमेश्वरात अभेद जाणणे ही अव्यभिचारी भक्ती तर मी विश्वच आहे हे न जाणून त्यात भेद पाहणे ही व्यभिचारी भक्ती होय. 'एकच देव आहे हे न जाणून प्रत्येक देवागणिक वेगवेगळा भाव धरणारा, वेगवेगळ्या हेतूंनी त्यांची उपासना करणारा ज्ञानदेवांना पसंत नाही. त्यांनी या व्यभिचारी भक्तीचे वर्णन ज्ञानेश्वरीत (अ.९३:८०७-८२९) केले आहे. पुढे पू. दांडेकर म्हणतात, ''तात्पर्य, एकं सन्तं बहुधा कल्पयन्ति । या वैदिक बैठकीवरून केल्या जाणाऱ्या प्रतिमापूजन, वारी इत्यादी सगुणोपासनेचे प्रकार ज्ञानदेवांना मान्य होते. पण त्यांना अज्ञानपणाने भक्ती म्हणून काहींतरी करणे मान्य नव्हते. श्री ज्ञानेश्वर म्हणतात- 'तर विश्वासकट सर्व मी आहे, अशा प्रकारे मला जाणणे, ती अव्यभिचारी भक्ती.' येथे (या विश्वात व माझ्यात) काही भेद पाहिला, तर तो व्यभिचार होतो. (अ.१४:३८०-३८२) हे सहज घडत नाही. त्यात कष्ट, सायास, अभ्यास आहे. ही अद्वैतावस्था प्राप्त करण्याची इच्छा करणाऱ्या तीन अवस्था आढळतात. मी त्याचा आहे. 'तस्यैवाह' ही पहिली अवस्था. जसजशी अधिक आंतरिकता प्राप्त होत जाते तेव्हा तो म्हणू लागतो, 'माझे स्वामी, माझेच आहेत'- 'अमेवासौ.' शेवटी आत्यंतिक आंतरिकता येते तेव्हां मी व तो एकच- 'सएवाहं' हा भाव येऊन बुद्धी स्थिर होते.

गीतेचे सातव्या अध्यायात भगवंतांनी अधिकार भेदानुसार चार प्रकारच्या भक्तींचे वर्णन केले आहे. आर्तानें दुःख निवारणार्थ केलेली भक्ती, जिज्ञासूने ब्रह्मज्ञान प्राप्तीसाठी केलेली भक्ती, अर्थार्थीने धनादीकरता आणि ज्ञान्याने आवडीने केलेली भक्ती. पहिले तीन भक्त अविद्यायुक्त व चौथा अविद्यारहित असा ज्ञानी भक्त असतो.

(क्रमशः)

(अंतिम भाग ३ पुढील अंकात)

ooo

## निवेदन

'श्री साईलीला' द्वैमासिक मालकीबद्दल व अन्य तपशील दरवर्षी फेब्रुवारीनंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाचे निवेदन.

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशनाचे स्थळ | - | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. |
| २. प्रकाशनाचा कालावधी | - | द्वैमासिक |
| ३. मुद्रकाचे नाव | - | द. म. सुकथनकर |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| पत्ता | - | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. |
| ४. प्रकाशकाचे नाव | - | द. म. सुकथनकर |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| पत्ता | - | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. |
| ५. संपादकाचे नाव | - | द. म. सुकथनकर |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| ६. हे पत्र ज्याच्या मालकीचे | - | श्री साईबाबा संस्थान, शिरडी आहे, त्यांचे व १ टक्क्याहून (धार्मिक व चॅरिटेबल संस्था) अधिक भांडवल धारण करणारे भागधारक किंवा भागीदार यांची नावे व पत्ते |

मी, द. म. सुकथनकर, यानुसार असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीनुसार व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

द. म. सुकथनकर

(प्रकाशकाची सही)
अध्यक्ष
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

# श्री स्वामी नामजपानेच कलियुगी दुःखमुक्ती सिद्धसिद्धांत शिरोमणी ग्रंथातील तत्त्वबोध

- प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे



❖❖❖

**श्री स्वामी समर्थ अक्कलकोट महाराज यांची १२० वी पुण्यतिथी दि. २४ एप्रिल ९८ रोजी सर्वत्र साजरी होत आहे. कलियुगी दुःखे फार आहेत. त्यातून दुःखमुक्त होण्यासाठी दृढ श्रद्धेने आणि निःशंकमनाने श्री स्वामीनामाचाच नित्यजप करावा, असा तत्त्वबोध 'श्री स्वामीसमर्थ सिद्ध सिद्धांत शिरोमणी' या ग्रंथात केलेला आढळतो. त्याचा मागोवा इथे घेतला असून तो प्रेरक नि मार्गदर्शक ठरावा.**

❖❖❖

श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी - महोत्सवात 'धर्मसंकीर्तन - सप्ताह' संदर्भात सेवाभावनेने सादर होताना प्रतिवर्षी त्यांच्याविषयीचा एक चरित्रग्रंथ कुणी ना कुणी हाती आणून दिला आणि त्यातील तत्त्वबोध पहा, अशी जणू विनंतीवजा परंतु आज्ञाच केली. ती आज्ञा प्रमाण मानून त्या त्या चरित्रग्रंथातील 'भक्तिसार' मला पाहता आले, हा ईश्वरी कृपेचाच सुयोग होय, अशी माझी श्रद्धा आहे. त्याच भूमिकेतून मी चिंतन - मनन - लेखन करीत राहिलो. सांप्रतची पोथीदेखील तिचे रचयिते श्री. माधवीकांत शौचे यांची हाती दिली. त्यातील तत्त्वबोधाचा मागोवा इथे विनम्रपणे घेतला आहे. तो उपकारक व्हावा.

## चरित्रग्रंथाचे स्वरूप

'श्री स्वामीसमर्थ सिद्ध सिद्धांत शिरोमणी' हा चरित्रपर ओवीग्रंथ श्री. माधवीकांत यांनी रचिला असून तो त्यांच्या पत्नी सौ. माधवी शौचे यांनी १९९१ साली प्रसिद्ध केला आहे. श्री. पंडित मनोहरजी (मनु - मुद्रण, गोरेगाव, मुंबई) यांनी तो प्रकाशित केला आहे. या ग्रंथांचे पारायण करणाऱ्या भाविकांना, 'कल्याणप्रद' ठरेल, अशी मनोकामना ग्रंथकर्त्यांनी आरंभी केली आहे. हा ओवीग्रंथ एकूण २१ अध्यायांचा असून त्या प्रत्येक अध्यायात १११ ओव्या आहेत. शिवाय प्रत्येक अध्यायाला स्वतंत्र नावे आहेत. श्री स्वामींच्या प्रेरणेनेच हा ओवीग्रंथ सिद्ध झाला आहे, हेही श्री. माधवीकांत यांनी नमूद केले आहे. प्रत्येक अध्यायातील १११ ओव्या म्हणजे 'देखा भावभक्तीचे निरांजन। एकशे अकरा वाती जाण। त्या लाविल्या म्या प्रेमे करून। श्री स्वामी चरणी अर्पण' (अ. ९ ओवी १०७) अशी त्यांची 'भावभक्तीमय अंतः करणातील प्रेमप्रकाशरूपे' आहेत. त्यांत स्वामींची स्नेहकृपा हीच तूप आहे. तूप ही प्रकाशक - प्रेरणाशक्ती आहे. त्यायोगेच या ओव्या स्वामीभक्तीची प्रकाशरुपे दाखवितात. स्वामीभक्तीचे रहस्यदर्शन घडविणाऱ्या या १११ वाती म्हणजे १११ तारकमंत्र आहेत. वाती जरी 'वाकड्यातिकड्या' असल्या तरी त्यांचा प्रकाश मात्र 'लख्ख' आहे. त्यायोगे संशय, अज्ञान, दुःख हे दूर होईल, असे ग्रंथकर्त्याने म्हटले आहे. ग्रंथातील एकूण २३३१ ओव्यातील मुख्यार्थ असा की, मनुष्याला संसार आहेच आहे. संसारात अनेक दुःखे आहेत. सर्वाधिक दुःख म्हणजे बुद्धिभ्रंशाने होणाऱ्या कलहाचे आहे. कलियुग म्हणजे कलहयुगच: मग दुःखमुक्त व्हायचे असेल तर श्री स्वामीनामाचा 'नित्यजप' करावा. प्रपंची आणि परमार्थी सुखी व्हावे.

## 'अक्कल से खुदा पहचानो'

श्री स्वामी समर्थांनीच 'अक्कल से खुदा पहचानो' असा बोध केला होता. त्याचा भावार्थ कोणता? तर 'बुद्धियोगाने ईश्वर जाणावा' हा आहे. त्याचा उलगडा असा करता येणे

शक्य आहे की, बुध्दीने म्हणजे सद्बुद्धीने... सद्बुद्धीने म्हणजे नामबुद्धीने... नामबुद्धीने म्हणजे गुरुमंत्राने... गुरुमंत्राने म्हणजे गुरुमंत्राचे नित्यस्मरण करून... देव जाणा! श्री गणेश ही बुद्धिदेवता आहे. आकारचरण युगुल हे गुरुपाद आहेत, उकारउदरविशाल हे उदार अंत:करण आहे. मकार महामंडळ हे विनम्रबुद्धीचे प्रतीक आहे. हे तिन्ही एकवटले म्हणजे शब्दब्रह्म तयार होते. तेच आदिबीज आहे, तेच नामबीज आहे. देव का भेटत नाही? तर स्व-स्वरूपाविषयीचे असलेले अज्ञान आणि प्रपंचाविषयीचा असलेला फाजील अभिमान. म्हणून 'ह्या कारणे विश्वास धरावा। सद्गुरुचरणी भक्तिभावा। योगक्षेम स्वधर्मे आचरावा। श्री स्वामीशी शरण रिघोनी' (अ. १ ओवी ३५) सांसारिक दु:खापासून मुक्त व्हायचे असेल तर 'श्री स्वामीनामाचे भजन करा' हा तरणोपाय ग्रंथकर्त्याने सांगितला आहे, गुरुंना शरण गेल्यासच नामबुद्धी प्राप्त होते. त्या नामाचे स्मरण म्हणजेच भजन होय. ते 'गुरुस्मरणी श्वासोच्छ्वास। श्री स्वामी समर्थ जपे उल्हास' या प्रकारे केले पाहिजे. लोक भक्तिमार्गाला लागत नाहीत. कारण त्यांच्या मनात संप्रदाय, गुरू, नाम याविषयीच प्रथमत: अनेक शंका असतात. त्यांचे निरसन करावयाचे असेल तर प्रथम गुरूचरणी दृढ विश्वास धरायला हवा. मन नि:शंक करायला हवे. आपण स्वीकारलेला भक्तिमार्गच आपला उद्धार करू शकेल, याविषयी खात्री व्हायला हवी. 'श्री स्वामीनामे महासिद्ध। अक्कलकोटी राहिले प्रसिद्ध। 'अक्कल से खुदा पहचानो' बुद्ध। म्हणुनि बुद्धियोग साधावा' (अ. १ ओवी ६५) बुद्धियोगासाठी 'गुरुस्मरणे मार्ग मिळे' असेही ग्रंथकर्ता सांगतो. 'गुरुवीण ज्ञान नाही। गुरूवीण परमार्थ नाही' हे तर खरेच. श्री स्वामी हे भक्तांवर केव्हा कृपा करतील? कशी कृपा करतील? याविषयी चरित्रकार सांगतो की, 'श्री स्वामीसी नको द्रव्यभार। नको पूजा उपचार। ते साक्षात पूर्ण ब्रह्मथोर। नाम स्मरणे कृपा करिती' (अ. १ ओवी १००) हीच त्यांची स्वरूपस्थिती आहे.

## कलियुग म्हणजे काय?

कलियुग हे कालगणनेनुसार जे कोणते असेल ते असेल. पण सर्वसाधारणपणे पाहिले तर देह-इंद्रियांचे परस्परांशी भांडण हेच खरे कलियुग आहे. कलह हेच त्याचे स्वरूप आहे. माणसाला दंभ अहंकार फार आहे. म्हणून ग्रंथकर्त्याने कर्पुरारतीची एक संगती लावून दाखविली आहे. देवापुढे आपण कापूर का लावतो? तर आपला अहंकार जळून जावा म्हणून! कापूर जळून जातो, तेव्हा खाली काहीही शिल्लक राहत नाही. तसे अहंकाराचे पूर्णत्वाने निर्दलिन व्हावे. 'कापुरारती करिता। अहंकार तो जाळावा' (अ. २ ओवी ५२) असे ग्रंथकर्ता सांगतो. गुरूने दिलेले नाम म्हणजे 'सुबुद्धीची नौका' आहे. त्यायोगेच संसारातून दु:खमुक्त होता येईल. श्री स्वामीनाम ही आनंदाची गुरुकिल्ली आहे. 'किल्ली असता श्री स्वामीनामाची। कुलुपे उघडा आनंदघनाची। नको शंका अधिष्ठानाची। यथाभक्ती तथा फलम्' (अ. २ ओवी ९८) प्रपंच हा देवघेवीचा, तसा देवघेवीबरोबर हेव्यादाव्याचाही आहे. मग त्यातून परमार्थ करायचा असेल तर त्यातल्या प्रेमभावासाठी 'त्यांचे नाम हेचि पुण्यस्मरण। घोर संकटी उद्धरण। भवसागराचे हे तारण। नामस्मरण नित्यकरा' (अ. ३ ओवी ७२) भक्ती ही धीर-गंभीर या दोन्ही स्वरूपात करावी. धीराने म्हणजे प्रयत्नपूर्वक आणि गांभीर्याने म्हणजे मनापासून! 'ज्ञानप्रकाश मोक्षकारक। तेथे गुरु असे तारेक। गुरू मिळता अलौकिक। संशय जाळे न राहती' (अ. ४ ओवी ५) गुरुशिवाय परमार्थाची चर्चाही व्यर्थ आहे, असे थोर संत व तत्त्वज्ञ श्री गुरुदेव रानडे यांनी 'एकनाथ वचनामृत' ग्रंथात म्हटले आहे. भक्तिमार्ग हा गुरुमुळेच कळतो आणि अनुसरताही येतो. नाम हे साधन आहे. स्मरण ही उपासना आहे. सुख, आनंद, शांती हे फळ आहेत. कलियुगात म्हणजेच देह, इंद्रिये यांच्यात सतत वाद, भांडण, कलह असल्याने दु:ख होणे अटळ आहे. ग्रंथकर्त्याने कलियुगाचे स्वरुप स्पष्ट केले आहे. तो म्हणतो माणसाजवळ बुध्दी आहे. ती अहंकार स्वरुप आहे. सुबुध्दीशिवाय त्याच्या मनात विनम्रता येणारच नाही. सुबुध्दी म्हणजे नामबुध्दी (गुरुमंत्र) होय. पण अहंकारी बुध्दिवैभवामुळे माणूस सतत वाद घालतो. ही बुध्दी म्हणजे 'फाल्गुनातील-शिमगा' होय. (अ. ४ ओवी २९) संशयामुळे सुबुध्दीचा स्वीकार केला जात नाही. 'भूतमात्रांचा न हो उध्दार। सद्गुरुंचा न मिळे आधार। अविवेकी दगडांचा व्यापार। कलियुगी अत्यंत मातला' (अ. ४ ओवी ३१) अविवेकी दगड म्हणजे शब्दच्छल, वादविवाद, निदाटवाळी होय. सर्वकांही कलह त्यामुळेच माजतात. विवेकपूर्ण भूमिकेतून शब्दव्यापार झाला तर कलह कशाला माजेल ? पण देवाण-घेवाण याऐवजी आपण हेवेदावे, तंटेबखेडे करण्यातच मश्गूल असतो. हेव्यादाव्यांचे शब्दरुपी दगडच परस्परांना घायाळ करतात, दु:खी करतात. 'श्रीस्वामीनामाचे नामस्मरण। निववी भवदु:ख दारुण। बुध्दी प्रपंच सद्गुण। समन्वय ठायी साधेल की' (अ. ४ ओवी ६१) नामस्मरणानेच 'विवेक' जागा होतो. प्रपंच-परमार्थ सुखाचा होतो.

## दर्शनमात्रे सुख होय...

श्रीस्वामींच्या नामाचा तर नित्यजप करायलाच हवा. पण तेवढीही सवड झाली नाही तर 'केवळ दर्शनाने सुख होईल.' अशी त्यांची स्वरुप स्थिती आहे, असे चरित्रकार सांगतो. 'सहस्त्रजन्म करी अभ्यास। परी होती व्यर्थ सायास। पदरी न पडे, केवळ आभास। श्रीस्वामीदर्शन सर्व सिध्द' (अ.५ ओवी ९) त्यांचे दर्शन हेंच अभय देणारे असे आहे. त्यांच्या दर्शनानेच माणसाचे दु:ख हलके झाल्यासारखे वाटते.

कारण 'भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी' असे त्यांचे भक्तांना अभिवचन आहे. 'स्मरण करताक्षणी, आम्ही प्रकट असू' हे त्यांचे ब्रीद आहे. त्यामुळे त्यांच्या दर्शनाच्या ओढीने, त्यांच्या दरबारात आलेला भक्त, त्यांचे दर्शन होताच सुखी होतो, आनंदी होतो, शांत होतो. श्रीस्वामींचे नाम म्हणजे परीस आहे. त्या नामाचा जिव्हेला, कानाला, डोळ्यांना स्पर्श झाला कीं, जीव उध्दरण्याची वाट चालू लागतो. अनुभवाशिवाय नुसते पढिक-पांडित्य काय कामाचे ? 'नुसते ज्ञान नसे उपयोगी । भावभक्ती हवी सवेगी । प्रचिती देखता अवघी । श्रीस्वामीकृपा होतसे' (अ. ५ ओवी १०८) बुध्दिभ्रंशाने येणारा दुःखभोग टाळण्यासाठी भक्तिभावाने सेवा करा ! श्री स्वामींचा उपदेश.

*कलियुग म्हणजे कलहयुग..देह इंद्रियांचे भांडण...त्यायोगे दुःखभोग...बुध्दिमालिन्य किंवा बुध्दिभ्रम यायोगेही वाट्याला येते ते केवळ आणि केवळ दुःखच ! त्यासाठी सुबुध्दीने परमार्थप्रवृत्त व्हावे आणि सदबुध्दीस्वरुप नामाची कास धरावी. भक्तिभावे करावयाची सेवा ती हीच ! 'श्री स्वामीसमर्थ सिध्द सिध्दांत शिरोमणी' ग्रंथात श्री. माधवीकांत या ग्रंथकर्त्याने श्री स्वामी समर्थांचा हाच उपदेश सर्वापर्यंत नेऊन पोहोचविला आहे. त्याचाच हा मागोवा. सर्वांना उपकारक ठरावा.*

मनुष्यजन्म म्हणजे कर्मभोग अटळ आहे. पूर्वजन्मातील कर्मानुसार माणसाच्या वाट्याला दुःखभोग येतो, असे अध्यात्मशास्त्र सांगते. त्याचा आधार घेऊन ग्रंथकर्त्यानेही तीन कर्मभोग कोणते ? हेही विशद केले आहे. १) सात्विक २) राजस ३) तामस या तीन प्रकारचे कर्मभोग असतात. सात्विककर्म करताना निरपेक्षभावनेने, पण स्वकर्तव्यास जागून कर्म केले तर माणूस उत्तम गतीला जातो. कामना ठेवून केलेले कर्म ते राजसकर्म होय. इच्छापूर्ती करुन घेणे हाच या कर्मभोगाचा धर्म असतो. तामसकर्मे परपीडा करणारी असतात. अविवेक, दारिद्र्य, स्वार्थ, दैन्य हा त्या कर्मांचा परिपाक असतो. "कर्म नेहमी चांगले करावे. केवळ पोट भरण्यासाठी कर्म करु नये. तशा कर्मे किडामुंगीदेखील करते. ती कर्मे दुःखच देतात. श्री स्वामी नामाचे स्मरण करुन जीवनात आनंद निर्माण करावा." (अ. ६ ओवी ३८) गुरुस्मरण अखंड असावे, तरच संशय नष्ट होतो. "सत्कर्मे करावीतच, पण श्रेष्ठकर्म म्हणजे गुरुमंत्राचे स्मरण होय." (अ. ६ ओवी ५५) सद्‌बुध्दी म्हणजे नामबुध्दी. ती स्वीकारली तरच शुध्दबुध्दी निर्माण होते. मग तिथे अविवेक कसा होईल ? अविवेक नसेल तर संघर्ष कसा होईल ? संघर्ष नसेल तर दुःख कसे होईल ? नाहीच नाही. म्हणून नित्यजप करीत असावे. स्वामीनाम हा मोक्षाचा दिवा...

नामाचे स्मरण आणि स्मरणमात्रे दर्शन...दर्शनमात्रे आनंद आणि आनंदमात्रे मोक्ष, अशी ही भक्तिमार्गाची वाटचाल आहे. ग्रंथकार सांगतो 'श्री स्वामीनामाचा हा दिवा । मोक्षमार्ग दावी स्वभावा । अहंकाराचा जाळुनी ठेवा । भक्ती प्रदीप होतसे' (अ. ६ ओवी ९५) भक्तिमार्गातली खरी अडचण अहंकार हीच आहे. मद-मस्तीनेच दुःखही पदरी येते. म्हणून गुरुमंत्र (श्रीस्वामीनाम) हाच मार्गदर्शक दिवा आहे. भक्तिमार्ग उजळणारी ती एक शक्ती आहे. हा नामदिवा कुठेही ठेवला तरी तो प्रकाशस्वरुपच आहे. तो मोक्षाकडेच नेतो. आनंदच देतो.
■ संसारात दुःख कां ? तर त्याचे आणखी एक कारण म्हणजे अतिलोभ हे आहे. 'गृहस्था अतिलोभ नसावा । मिळेल त्यांत संतोष व्हावा । योग्य खर्च प्रपंच करावा । आनंदित राहोनिया' (अ. ७ ओवी २०) मातीचे ढेकूळ होते, तिथे चांदी मिळाली. तर सोने कां मिळू नये ? हा लोभ माणसाला असतो. श्री स्वामींनी म्हटले आहे की, 'अतिलोभाचे फळ दुःख । जाणा तुम्ही स्वाभाविक । दैवयोगे जे मिळे देख । संतुष्टमन असावे' (अ. ७ ओवी २१) हा उपदेश सर्वाधिक महत्त्वाचा होय. प्रपंच सुखाचा होण्याचे हे तत्त्व !

'जशी सेवा, तसे फल' हा तर भक्तिमार्गाचा सिध्दांतच आहे. ही सेवा सद्‌भावानेच केली पाहिजे. देहभाव अहर्निशी जपण्यात जसे आपण दक्ष असतो, तसे सेवाभाव जपण्यात दक्ष असले पाहिजे. 'नामस्मरण हीच सेवा । भावभक्ती हाचि ठेवा । सर्व कार्यी स्वामींचा धांवा । करिता कर्मदोष न राहे' (अ. ८ ओवी २६) 'सेवा करिता ज्ञानमिळे । ज्ञानेभक्ती प्रेम उसळे । तेणे गुणे साधन जुळे । मुक्तिमार्ग सापडे' (अ. ८ ओवी ३२) समाजातले दैन्य, दुःख कमी करणे हीही सेवाच आहे. कर्म कोणते योग्य? कोणते अयोग्य? अशा बुध्दिमालिन्याने किंवा बुध्दिभ्रंशानेच दुःख निर्माण होते. 'भक्तिभावे दृढविश्वास । श्रीस्वामी सेवा बहुवस । तेणे स्वभावे मुक्ती उल्हास । तुम्हा सहजी मिळेल कीं' (अ. ८ ओवी ६०) गुरुंना आपण आपले माता-पिता मानावे. म्हणजे ते आपला सांभाळ करतात, आपले रक्षण करतात, आपल्या इच्छाही पुरवितात. हे मनाशी जाणून घेतले तरच भक्तिप्रेम निर्माण होते.

या ओवीग्रंथाचा आणखी एक विशेष म्हणजे अध्याय नववा हा ग्रह-ज्योतिषविषयक आहे. त्यात ग्रहस्थिती व ज्योतिष फले दिली आहेत. ज्योतिषशास्त्राची रुची व त्याचा अभ्यास असलेल्यांनी तो संपूर्णपणे पहावा. परंतु ग्रंथकर्त्याने या अध्यायाचे फलित फार चांगले सांगितले आहे. ते म्हणजे गृह-ज्योतिष कांहीही असो. गुरु हेच सर्वात श्रेष्ठ व शक्तिमान आहेत. त्यांच्या कृपेने अशुभ फले नष्ट होतात. अध्याय दहावा आणि अकरावा यामध्येही ग्रह-ज्योतिषविषयक चर्चा सापडते. 'किती असोत नवग्रह दोष । श्रीस्वामीजपे तुटे पाश । ते वीदानधर्म सुधारस । अगत्य तुम्ही अंगिकारा । श्रीगुरु सांगती तुम्हास । नुका भिऊ कळिकाळास । आचरे स्वधर्मकर्म